


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४१ ■ बुधवार, दि. ११ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## अकोल्यात ऑफलाईन बुकिंग का नाही

**अकोला:** अकोल्यात अनेक गॅस एजन्सी ॲप, मोबाईलद्वारे बुकिंग घेत आहे. पण, ग्राहक गॅस एजन्सी ऑफिसला जात बुकिंग करण्यासाठी जात असताना त्याचे बुकिंग घेतले जात नाही. अनेक ग्राहकांना नाहक त्रास याचा होत असून पुरवठा विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाचे याकडे दूर्लक्ष का असा प्रश्न उपस्थित होत आहे. लोकप्रतिनिधींचे पण या समस्यांकडे लक्ष नसल्याची नागरिकांची ओरड आहे. बुकिंग केल्यावर चार ते पाच दिवसांनी गॅस सिलेंडरचे डिलिव्हरी होत आहे. अकोल्यात ग्राहकांनी ९३३ पेक्षा अधिकची रक्कम गॅस वितरक किंवा घरपोच सिलेंडर देणाऱ्यांना देऊ नये असे आवाहन पुरवठा विभागाने केले

# देशभरात एल पी जी ची टंचाई एजन्सीबाहेर लांब रांगा !

## यूपी-बिहारमध्ये पोलिसांच्या संरक्षणात सिलिंडरचे वाटप सुरू

वृत्तसंस्था ११ मार्च

**नवी दिल्ली:** अमेरिका-इस्त्रायलच्या इराणसोबतच्या युद्धामुळे देशभरात एलपीजीची टंचाई निर्माण झाली आहे. गॅस सिलिंडर घेण्यासाठी एजन्सीबाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत.दिल्ली, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसह अनेक राज्यांनी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर बंदी घातल्याने हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये जेवण बनवता येत नाहीये.




व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा थांबल्याने सर्वात जास्त संकट हॉटेल-रेस्टॉरंटवर आहे. तर, घरगुती स्वयंपाकाचा गॅस घेण्यासाठी गॅस एजन्सींच्या बाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत.ज्या घरांमध्ये लग्न आहे, ते तणावात आहेत. एकट्या भोपाळमध्येच २० दिवसांत एक हजारपेक्षा जास्त लग्न आहेत. केटरर्सचे म्हणणे आहे की ही आणीबाणीसारखी परिस्थिती आहे.उत्तर प्रदेशमध्ये बुकिंग केल्याच्या ४ ते ५ दिवसांनंतरही सिलिंडर मिळत नाहीत. गॅस एजन्सींच्या बाहेर रांगा लागू लागल्या आहेत. गोरखपूर-सिद्धार्थनगरमध्ये पोलीस संरक्षणात सिलिंडर वाटले जात आहेत.एजन्सींवर पहाटे ३ वाजल्यापासूनच लोक रांगा लावण्यासाठी पोहोचत आहेत. तासनतास वाट पाहत आहेत, पण सिलिंडर मिळत नाहीत. कारण - सिलिंडर कमी आहेत आणि घेणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

येथेही २ दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरची बुकिंग बंद आहे. यामुळे हॉटेल, रेस्टॉरंटवर परिणाम झाला आहे. घरगुती गॅससाठीही राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये लोकांच्या लांबच लांब रांगा दिसल्या.गोपालगंज, खगडिया, औरंगाबाद, पटनासह अनेक जिल्ह्यांमध्ये लोक सकाळपासूनच गॅस एजन्सीमध्ये पोहोचू लागले. अनेक एजन्सींना कुलूप लावलेले आहे. येथे कोणताही कर्मचारी उपस्थित नाही. कमर्शियल गॅस सिलिंडरचा पुरवठा पूर्णपणे थांबला आहे. अशा परिस्थितीत, वेगवेगळ्या एजन्सी ठरलेल्या दरापेक्षा जास्त किमतीत सिलिंडरची काळाबाजार करत आहेत. भास्करच्या स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड झाले की जयपूरमध्ये १९११ रुपयांना मिळणारा सिलिंडर २५०० रुपयांपर्यंत विकला जात आहे. भास्करने जयपूरमधील एका हॉटेलमध्ये आलेल्या गॅस सप्लायरचे (इंडेन) स्टिंग ऑपरेशन केले. अलवरमध्ये एका गॅस एजन्सीवर जोरदार गोंधळ झाला. येथे ग्राहकांनी एजन्सीवर काळाबाजारीचे आरोप केले.लुधियाना आणि फरीदकोटमध्ये सर्व्हर डाउन झाल्यामुळे घरगुती सिलिंडरची बुकिंगही करता येत नाहीये. याशिवाय, फरीदकोट, होशियारपूर आणि पटियालासह अनेक जिल्ह्यांमध्ये सोमवारपासून कमर्शियल सिलिंडरचा पुरवठा बंद आहे.

## अकोल्यात उष्णतेचा यलो अलर्ट!

प्रतिनिधी ११ मार्च

**मुंबई :** राज्यभरात आता उन्हाची धग जाणवू लागली आहे. कमाल तापमान ३६ ते ४० अंशांच्या दरम्यान राहत असून, तीन दिवसांपासून अकोल्याचे तापमान राज्यात उच्चांक नोंदवत आहे. आता हवामान विभागाने मुंबई, पालघर, ठाणे या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. अकोल्यात उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

मुंबईत आज ४० अंशापर्यंत तापमान पोहोचण्याचा अंदाज आहे. विदर्भासह मराठवाड्यात शुष्क व कोरडी हवा राहणार आहे. दुसरीकडे, शुक्रवार आणि शनिवारी (१३, १४ मार्च) विदर्भासह मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार, मराठवाड्याच्या दक्षिण भागात लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने, १३ मार्च रोजी यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. तर १४ मार्च रोजी, नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना पावसाचे येलो अलर्ट देण्यात आलेत. तर मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

# एलपीजी क्षेत्रात महाराष्ट्राचा डंका ! पण....

## घरगुती गॅस ग्राहकांच्या संख्येत देशात दुसरे
## बडनेरा आणि उरणमध्ये नवे प्रकल्प सज्ज केव्हा होणार

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला:** देशात, राज्यात आणि अकोल्यात गॅस टंचाई असताना देशातील घरगुती गॅस क्षेत्रात महाराष्ट्र राज्याने आपली पकड अधिक घट्ट केली आहे. १ एप्रिल २०२५ पर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार, ग्राहक संख्येत उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून, पायाभूत सुविधा आणि बॉटलिंग क्षमतेमध्येही राज्याने मोठी झेप घेतली आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, संपूर्ण भारतात घरगुती गॅस जोडण्यांची संख्या ३२ कोटी ९७ लाखांवर पोहोचली आहे. राज्यांचा विचार करता उत्तर प्रदेशात ४ कोटी ८३ लाख ग्राहकांसह देशात प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात ३ कोटी १७ लाख ग्राहकांसह देशात दुसऱ्या स्थानावर असून, पश्चिम भारतात राज्याचे वर्चस्व कायम आहे. त्याच वेळी पश्चिम बंगाल २.५ कोटी आणि तमिळनाडू सव्वा दोन कोटी ग्राहक आहे. देशभरात सध्या २५,५९६ गॅस वितरण एजन्सी असून त्यापैकी १७,५०० ग्रामीण भागात कार्यरत आहेत. उज्ज्वला योजनेच्या विस्तारामुळे ग्रामीण भागात गॅस पोहोचण्यास मोठी मदत झाली आहे.

केवळ ग्राहक संख्येतच नाही, तर गॅस पुरवठा साखळी आणि आधुनिकीकरणात ही महाराष्ट्र आघाडीवर आहे. महाराष्ट्राची एकूण एलपीजी बॉटलिंग क्षमता २,७३०इतकी भक्कम आहे, जी सार्वजनिक क्षेत्रातील तीन प्रमुख तेल कंपन्यांच्या माध्यमातून विभागली गेली आहे. अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथे एक नवीन बॉटलिंग प्लांट उभारला जात आहे. मार्च २०२६ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जागतिक बाजारपेठेतील चढ-उतारांपासून पुरवठा सुरक्षित ठेवण्यासाठी उरण येथे ३०,००० मेट्रिक टन क्षमतेचा भव्य साठवणूक प्रकल्प उभारला जात आहे. याचे काम जून २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. रस्त्यावरील टँकर्सवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी पाईपलाईन जाळ्याचा विस्तार केला जात आहे. महाराष्ट्रात सध्या उरण-चाकण ही १६४ किलोमीटर लांबीची पाईपलाईन कार्यान्वित आहे. या नवीन प्रकल्प आणि पायाभूत सुविधांमुळे महाराष्ट्रातील एलपीजी पुरवठा भविष्यात अधिक सुरक्षित, वेगवान आणि किफायतशीर होणार आहे.

## नवे राज्यपाल जिष्णू देव वर्मा

**मुंबई :** महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली.

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

जिंदगी बेहतर करने का सुनहरा अवसर
WORK FROM HOME
संधी सर्वांसाठी, घर से काम करें
सभी के लिए बराबर अवसर ?
Work Part Time/Full time
कौन कर सकता है?
स्टुडन्ट/ गृहिणी/ व्यापारी/नौकरी/ बेरोजगार/ व्यवसायी/ रिटायर्ड / कर्मचारी जॉब करते हुए
-:संपर्क:-
9765357896

# 'शेगाव'चा महाप्रसाद अविरत!

## सौर ऊर्जा आणि वाफेच्या शक्तीने दिला जगाला नवा आदर्श !

प्रतिनिधी ११ मार्च

**शेगाव :** सध्या जागतिक स्तरावर अमेरिका आणि इराक यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत. पेट्रोलियम पदार्थांच्या तुटवड्याचा फटका मोठ्या व्यवसायांपासून ते सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत बसत आहे. अनेक मोठ्या देवस्थानांना गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेसाठी कसरत करावी लागत असताना, विदर्भाची पंढरी मानल्या जाणाऱ्या श्री गजानन महाराज संस्थानने मात्र या संकटावर आपल्या दूरदृष्टीने मात केली आहे.

जिथे दररोज हजारो भाविक श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतात, तिथे इंधनाची कमतरता भासणे म्हणजे मोठ्या चिंतेचा विषय. मात्र, शेगाव संस्थानमध्ये गॅस सिलेंडरच्या तुटवड्याचा प्रश्नच उद्भवत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे येथील स्वयंपाकघरात वापरले जाणारे अत्याधुनिक स्टीम बॉयलर आणि सौर ऊर्जा तंत्रज्ञानांवर आहे.



**शिस्त, स्वच्छता आणि नम्रतेचा त्रिवेणी संगम**
केवळ व्यवस्थापनच नाही, तर 'शिस्त, स्वच्छता आणि नम्रता' या त्रिसूत्रीवर चालणाऱ्या या संस्थानने पुन्हा एकदा जगासमोर एक आगळावेगळा आदर्श ठेवला आहे. जिथे इतर संस्थांना इंधनाचे नियोजन करताना घाम फुटत आहे, तिथे शेगाव संस्थान आपल्या 'स्वयंपाकी' नियोजनामुळे या संकटापासून पूर्णपणे दूर आहे.'भक्तीला जेव्हा विज्ञानाची आणि दूरदृष्टीची जोड मिळते, तेव्हा संकटाचे रूपांतर संधीत होते,' हेच शेगाव संस्थानने आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे.

ऊर्जेचा शाश्वत स्रोत म्हणून संस्थानने सौर ऊर्जेला प्राधान्य दिले आहे. यामुळे पर्यावरणाचे रक्षण तर होतेच, शिवाय इंधनावरील खर्चही वाचतो. वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या मोठ्या यंत्रणेद्वारे अत्यंत कमी वेळात आणि स्वच्छतेने हजारो भाविकांचा स्वयंपाक तयार केला जातो.जागतिक बाजारपेठेत इंधनाचे भाव कितीही वधारले किंवा युद्धामुळे पुरवठा खंडित झाला, तरी वाफेवर चालणाऱ्या या व्यवस्थेमुळे महाप्रसादाचे वितरण नित्यनेमाने सुरू राहते.

# चार देशांकडून गॅस भरलेली जहाजे भारताच्या दिशेने रवाना !

## एलपीजी संकटावर भारताचा 'प्लॅन बी'



वृत्तसंस्था ११ मार्च

**नवी दिल्ली :** मध्य-पूर्वेतील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर तेल आणि वायू पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. भारतात निर्माण होऊ शकणारे एलपीजी संकट लक्षात घेता केंद्र सरकारने तातडीने आपला 'प्लॅन-बी' कार्यान्वित केला आहे. गॅसचा तुटवडा भासू नये यासाठी ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नार्वे आणि अल्जीरिया यांसारख्या देशांकडून एलएनजी आणि एलपीजीचा अतिरिक्त साठा भारतात येण्यास सुरुवात झाली आहे.

देशांतर्गत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयओसीएल, बीपीसीएल आणि एचपीसीएल यांसारख्या भारतीय रिफायनरींनी एलपीजीच्या घरगुती उत्पादनात १० टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे सामान्य नागरिकांना स्वयंपाकाच्या गॅससाठी रांगेत उभे राहण्याची किंवा तुटवड्याची भीती बाळगण्याची गरज भासणार नाही. भारत प्रामुख्याने कतार (४२ टक्के) आणि यूएई (११ टक्के) या देशांकडून गॅस आयात करतो. मात्र, युद्धामुळे या मार्गांत अडथळे येण्याची शक्यता असल्याने सरकारने आता ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नॉर्वे आणि अल्जीरिया या देशांशी संपर्क साधून अतिरिक्त मालवाहतूक जहाजे मागवली आहेत.

### असा आहे सरकारचा 'प्लॅन-बी'!

ट्रम्प टॅरिफ तणाव आणि जागतिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारताने केवळ खाडी देशांवर अवलंबून न राहता आपल्या आयात स्रोतांचे विविधीकरण केले आहे. या 'प्लॅन-बी' अंतर्गत भारताने पर्यायी देशांकडून गॅस कार्गो मागवले आहेत. यासोबतच देशांतर्गत उत्पादनात १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली असून, आयओसीएल, बीपीसीएल आणि एचपीसीएल या कंपन्यांच्या कार्यकारी संचालकांची समिती या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

### साठेबाजीवर कडक निर्बंध

गॅस संकट पाहता हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि बिगर-गरजेच्या व्यवसायांवर याचा परिणाम होऊ शकतो. मात्र, सरकारने स्पष्ट केले आहे की, 'घरगुती एलपीजी' पुरवठा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. व्यावसायिक आस्थापनांकडून होणारी गॅसची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने कडक पावले उचलली असून पुरवठ्यावर सतत देखरेख ठेवली जात आहे.

# आरटीई; 2 हजार 56 जागांसाठी 3 हजार 689 अर्ज

## 18 मार्चपर्यंत प्रवेश अर्जासाठी मुदत, एक किमीची अट केली रद्द

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** शिक्षण हक्क कायद्याच्या अंतर्गत (आरटीई) जिल्ह्यात प्रवेश प्रक्रियेला पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आरटीई अंतर्गत १८५ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ५६ जागांसाठी आतापर्यंत ३ हजार ६८९ अर्ज प्राप्त झाले आहेत. १० मार्च रोजी या प्रवेश प्रक्रियेतील अंतराची जाचक अट राज्य सरकारने रद्द केल्यामुळे १० मार्चपर्यंत मुदत वाढवून ती १८ मार्च करण्यात आली आहे. यामुळे पालकांना दिलासा मिळाला आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसाहाय्यित शाळांमध्ये शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी शिक्षण हक्क कायद्यांतर्गत अशा शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. या जागांसाठी दरवर्षी राज्यभर ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. यंदा १७ फेब्रुवारीपासून आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. सुरुवातीपासूनच पालकांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल होत असून अनेक पालक आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या अपेक्षेने या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे येत आहेत. मात्र यंदा नव्याने लागू करण्यात आलेल्या काही अंतराच्या अटींमुळे पालकांसह विद्यार्थ्यांना मर्यादित संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्यात नाराजीचा सूर होता आता ही अट काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे आता पालकांना जास्त शाळांची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच आतापर्यंत ज्या पालकांनी अर्ज केले असतील त्यांना त्यात दुरूस्ती करून नव्याने समाविष्ट शाळांचा पर्याय ते निवडू शकतात.

### दोन शाळांचा नव्याने समावेश

आरटीईअंतर्गत शाळेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती. तत्पूर्वी शाळांची नोंदणी झाली होती. त्यामध्ये १८३ शाळांनी नोंदणी केली होती. आता त्यात दोन नवीन शाळांची नोंदणी झाली असून ही संख्या १८५ वर पोहोचली आहे. अल्पसंख्याक दर्जा काढून टाकण्यात आल्याने पोदार इंग्लिश स्कूल, कृषीनगर अकोला व परशुराम नाईक शाळा, बोरगाव मंजू या शाळांचा समावेश आरटीई अंतर्गत झाला आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेला १८ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे.



# सहाय्यक नगररचनाकार विभागात एसीबी ट्रॅप

## तीन आरोपींना घेतले ताब्यात

प्रतिनिधी ११ मार्च

**अमरावती :** लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांनी कारवाई करून सहाय्यक नगर रचना विभागातील तीन आरोपींना काल ताब्यात घेतले आहे. गौरव अरुण भगत. वय ३५ वर्षे, पद- सहायक नगर रचनाकार, रा. नवसारी अमरावती, वर्ग २. तुषार अनिल नंद. वय ३८ वर्षे. पद - नगर रचनाकार. रा. स्म्‌ कॉलनी अमरावती, सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय, अमरावती. वर्ग १, अमन सुभाष भंडारी. वय २९ वर्षे, खाजगी इंजिनियर. रा परतवाडा. असे आरोपीचे नाव असून ३८ वर्षीय तक्रारदार यांच्याविरुद्ध तक्रार दिली होती. तक्रारदार यांचे काका व आई च्या सामायिकरित्या नावावर असलेल्या ९७ आर शेतजमीनीचे, रहिवासी प्रयोजनार्थ अकृषक करून, त्यावर लेआउट करण्याकरिता, संचालक, नगररचना शाखा कार्यालय, अमरावती येथे अर्ज केलेला होता. परंतु यातील आलोसे १ व २ हे मागील दहा महिन्यापासून वेगवेगळ्या त्रुट्या सांगून तक्रारदार यांचे काम करत नव्हते. दि. ०५/०३/२०२६ रोजी तक्रारदार हे नगररचना कार्यालयात गेले असता यातील आलोसे क्र. १ व २ यांनी तक्रारदार याना प्रति एकर ४०,००० रुपयाप्रमाणे ९७ आर जमीनीचे लेआउट पास करून देण्यासाठी एकूण १,००,०००/- रु लाचेची मागणी केल्यावरून तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांचेकडे तक्रार केली. १०/०३/२०२६ रोजी तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचांसमक्ष आलोसे १ व २ यांच्याकडे एकत्ररित्या पडताळणी केली असता आलोसे क्रमांक १ याने तक्रारदाराकडे सर्वांसाठी एक लाख रुपयाची लाच मागणी केल्याचे व आरोपी क्रमांक दोन याने सदर मागणीस दुजोरा देऊन प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.पडताळणी मध्ये आलोसे क्रमांक १ यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने १०/०३/२०२६ रोजी सापळा कार्यवाही केली असता त्यादरम्यान आलोसे क्रमांक १ याने १,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारून आपल्या ड्रॉवरमध्ये ठेवली. त्यानंतर ला. प्र. वि. च्या स्टाफला बघून त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या आरोपी क्रमांक तीन या खाजगी इसमाने आलोसे क्रमांक १ याला मदत करण्याच्या व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने ड्राव्हर मधील लाचेची रक्कम स्वतःच्या पॅन्टच्या खिशात लपवून ठेवली.

# तीन कोटींची एमडी ड्रग्स जप्त

प्रतिनिधी ११ मार्च



**अमरावती:** अमरावतीत तीन कोटी रुपयांचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी पत्र परिषदेमध्ये दिली. शहरातील अवैधरित्या अंमली पदार्थाची साठवणुक, विकी व वाहतुक करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करून अंमली पदार्थ विरोधात ZERO TOLERANCE POLICY राबविण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार पी गुप्त बातमीदार नेमुन तसेच तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली. ०८/०३/२०२६ रोजी गुन्हे शाखा पथक गुन्हेशाखा कार्यालयात हजर असतांना खास व विश्वासु बातमीदाराने गुन्हे शाखा अमरावती शहर येथे येवुन मॅफेडॉन (एम.डी) या अंमली पदार्थ विक्री साठी खरेदी करून बाळगले विषयी विश्वसनीय खबर दिली. इसम नामे अब्दुल फहीम अब्दुल रहीम उर्फ फहिम एफ.बी रा. आझाद नगर व शेख अयान शेख रमजान रा व्दारका नगर, अमरावती हे दोघे मॅफेडॉन (एम.डी) या अंमली पदार्थाचा व्यवसाय करतात व अमरावती मधील एम.डी या अंमली पदार्थाचा व्यवसाय करणा-या इतर काही लोकांकरीता मुंबई वरून मॅफेडॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ घेवुन येत असताना नमुद दोन्ही इसम हे मुंबई वरून मॅफेडॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ दोन दिवसा पुर्वी खरेदी करून आले असुन ते दिनांक ०८/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० ते ०७.०० वा. च्या सुमारास अमरावती मधील त्यांच्या ग्राहकांना विक्री करणे करीता तसेच अमरावती शहरात मोठया प्रमाणात अंमली पदार्थाची साठवणुक करूण विक्री करणा-या एम.डी माफीयांना पुरवठा करण्याकरीता ग्राम सुकळी वनारसी गावाकडुन लालखडी कडे येणारे रोडने पांढ-या रंगाच्या अॅक्टीव्हा मोपेड गाडी कंमाक एम.एच २७ डि.एन. ७८८३ ने येणार आहेत. अशी खात्रीलायक बातमी मिळाली. त्यावरून सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन गुन्हे शाखेच्या पथकाने ग्राम सुकळी वनारसी ते लालखडी या परिसरात नियोजनबंध्द सापळा रचला दिनांक ०८/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ६.०० वा ते ७.०० वा दरम्याण मिळालेल्या बातमी नुसार दोन इसम हे पाढ-या रंगाच्या मोपेड मोटर सायकल वरती येतांना दिसताच गुन्हे शाखेच्या पथकाने अतिशय शिताफीने नमुद इसम हे शेतामधे पळुन जात असतांना वाहनासह ताब्यात घेतले त्यानंतर दोन पंच व महसुल विभागाचे राजपत्रीत अधिकारी यांच्या समक्ष त्यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे अब्दुल फहीम अब्दुल रहीम उर्फ फहिम एफ. बी वय २५ वर्ष, रा. आझाद नगर, अमरावती, शेख अयान शेख रमजान वय २० वर्ष, रा व्दारका नगर, अम. असे सांगीतले त्यावरूण त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन २ किलो. ८० ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर किं.अ. ३,११,८५,०००/- रू तसेच गुन्हयात वापरलेली पांढ-या रंगाच्या अॅक्टीव्हा मोपोड गाडी क्रमाक एम.एच २७ डि.एन. ७८८३ कि.अ. ५०,०००/-रू व एक मोबाईल कि.अ. २५,०००/- रू असा एकूण किं.अ. ३,१२,६०,०००/-रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने ते जप्त करून नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे अप. कं ११२/२०२६ कलम ८ (क), २१ (क), २२ (क), २८,२९ एन.डी.पी. एस. अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रविवारी जिल्ह्यातील निरक्षरांना साक्षर होण्याची संधी

प्रतिनिधी ११ मार्च

**अमरावती:** 'उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत अमरावती जिल्ह्यात रविवार, दि. १५ मार्च रोजी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLANT) परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या निरक्षर व्यक्तींनी आपापल्या परीक्षा केंद्रांवर वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.या परीक्षेचा मुख्य उद्देश १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या निरक्षर व्यक्तींना मूलभूत साक्षरता कौशल्ये प्रदान करणे हा आहे. यात वाचन, लेखन आणि गणितीय कौशल्ये तपासली जातील.

# पालकमंत्र्यांनी दाखविली चित्ररथांना हिरवी झेंडी

प्रतिनिधी ११ मार्च




**अमरावती :** जिल्हा नियोजन व विकास समिती आणि अनुसूचित जाती उपयोजनेतून योजनांची माहिती देण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातर्फे साकारण्यात आलेल्या दोन चित्ररथांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विश्रामगृह येथे हिरवी झेंडी दाखविली. दोन्ही चित्ररथ जिल्ह्यात सर्व तालुक्यांमध्ये पोहोचून योजनांची माहिती देणार आहे.

यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार राजेश वानखेडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार आदी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे यांनी ग्रामीण भागात योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी चित्ररथाची संकल्पना महत्वाची ठरणार आहे. चित्ररथ हा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील जनतेपर्यंत नेण्यात यावा. चित्ररथाच्या माध्यमाने शाळांमधून विद्यार्थ्यांना त्यांच्यासाठी असलेल्या वसतिगृह, शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणासाठी असलेल्या योजनांची माहिती देण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा नियोजनच्या सर्वसाधारण योजनेतून प्रचार रथाच्या माध्यमातून मोदी आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, राष्ट्रीय पशूधन अभियान, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपाटिका, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, आयुष्मान भारत कार्ड या योजनांची प्रसिद्धी करण्यात येत आहे. अनुसूचित जाती उपयोजनेच्या निधीतून समता चित्ररथ तयार करण्यात आला आहे. यातून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, कन्यादान योजना, मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह, कर्मविर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, भारत सरकार मॅट्रीकोपूर्व शिष्यवृत्ती, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा करणे, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी निवासी शाळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, रमाई आवास योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनांचा प्रचार करण्यात येत आहे.

# आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजपत्रकासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक

प्रतिनिधी ११ मार्च

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या आगामी आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार, दिनांक १० मार्च २०२६ रोजी घेण्यात आली. ही बैठक महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध योजनांबाबत तसेच विभागनिहाय आर्थिक तरतुदींबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदींचा आढावा घेण्यात आला. स्वच्छता, आरोग्य, बांधकाम, उद्यान, प्रकाश व्यवस्था, कर वसुली तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित विभागांनी आगामी वर्षासाठी प्रस्तावित केलेल्या निधीबाबत आपले सादरीकरण केले. या सादरीकरणांवर आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बारकाईने चर्चा करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

शहरातील मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे, शहरातील स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा करणे, रस्ते व पायाभूत सुविधा मजबूत करणे तसेच विविध विकासकामांना गती देणे यासाठी आवश्यक आर्थिक नियोजन करण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

याशिवाय विविध विभागांनी सुचवलेल्या कामांच्या प्राधान्यक्रमाबाबतही चर्चा झाली. विकासकामे राबविताना शहराच्या सर्व भागांचा समतोल विकास साधण्यावर भर देण्यात यावा, तसेच निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर सुनिश्चित करण्यात यावा, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. बैठकीत प्राप्त झालेल्या सर्व विभागांच्या तरतुदींचा समावेश करून अंतिम अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयातून वीटभट्टी कामगाराची दगडाने ठेचून हत्या

प्रतिनिधी ११ मार्च

**बडनेरा :** अनैतिक संबंधाच्या संशयातून झालेल्या वादातून वीटभट्टीवर काम करणाऱ्या तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. अमरावती शहर गुन्हे शाखेने वेगाने तपास करत अवघ्या दोन तासांत या खुनाचा उलगडा करून आरोपीला अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी रायसोनी कॉलेजसमोरील मसला शिवारात एका युवकाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडल्याची माहिती नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तपासात मृताची ओळख सूरज पुसुलाल यादव (३१, रा. धानसोड, जि. गोंदिया) अशी पटली. तो मसला येथील वीटभट्टीवर काम करत होता.

चौकशीदरम्यान अनिल शिव धुर्वे (३५, रा. मोहडोंगरी, मध्य प्रदेश) याच्यासोबत ९ मार्च रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास त्याचे जोरदार भांडण झाल्याचे समोर आले. मृताच्या नातेवाईक महिलेशी अनिलचे अनैतिक संबंध असल्याचा सूरजला संशय होता. याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाला.

# 'जनगणना २०२७' साठी तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण

प्रतिनिधी ११ मार्च

**अमरावती, :** चिखलदरा येथील कॉफीचे संवर्धन व रोजगार निर्मिती उपक्रमाद्वारे पर्यटनाला चालना देण्याचे आश्वासन महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. चिखलदरा हेरिटेज कॉफी उत्पादनावर विशेष लक्ष केंद्रित करून चिखलदऱ्याची कॉफी ही देशपातळीवर नेण्यासाठी, कॉफीचे मार्केटिंग चिखलदरा ते दिल्लीपर्यंत करण्याचा संकल्प पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी केला. निमित्त होते नुकत्याच संपन्न झालेल्या उमेदच्या वैदर्भीय महिला मेळाव्याचे !

चिखलदरा हे देश पातळीवर पर्यटन केंद्र व्हावे, यासाठी चिखलदरा महोत्सवाला चालना देत असताना आदिवासी महिलांसाठी रोजगार निर्मितीचे विविध उपक्रम राबविण्यात येईल, असा विश्वास पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी वैदर्भीय मेळाव्यामध्ये व्यक्त केला. यावेळी महिलांनी मांडलेल्या विविध स्टॉल्सला त्यांनी भेटी दिल्या, त्या महिलांची संवाद साधत त्यांच्या उद्यमशीलतेचे कौतुक केले. विदर्भात 'चिखलदरा ' या एकमेव ठिकाणी कॉफीचे उत्पादन होत असल्याने कॉफीच्या उत्पादनावर आधारित मूल्यवर्धित उपक्रम येथे राबविण्यात येतील व यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करून दिल्या जाईल. यासोबतच चिखदरा ते दिल्लीपर्यंत मार्केटिंग करून चिखलदऱ्याची कॉफी राष्ट्रीयपातळीवर नेऊ. यासाठी आवश्यक मार्केट उपलब्ध करून दिले जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. वैदर्भीय महोत्सवातील बचतगटांच्या स्टॉल्सला भेटी देताना मेळघाटातील चिखलदरा येथील स्फूर्ती क्लस्टर कॉफी स्टॉलच्या उत्पादनाची माहिती जाणून घेतली. येथील कॉफी मेळघाटची विशेष ओळख ठरेल, असा विश्वास व्यक्त करून त्यांनी व्यासपीठावरून चिखलदरा कॉफीला प्रोत्साहित करण्याची घोषणा केली. यावेळी कॉफीद्वारे उत्पादित करण्यात आलेल्या सौंदर्य प्रसाधनाची शृंखला असलेली पेटी मीनाक्षी व भारती भालेराव यांनी व्यासपीठावर येऊन पालकमंत्री श्री.बावनकुळे यांना भेट देवून त्यांचे आभार व्यक्त केले आहे. केंद्रीय मंत्री सडक परिवहन व राजमार्ग भारत सरकार नितीन गडकरी यांनी चिखलदरा येथील कॉफी उत्पादनाबाबत मूल्यवर्धन प्रकल्प स्फूर्ती क्लस्टरच्या माध्यमातून शक्य असल्याबाबत व त्यावर एमगिरी महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्था, वर्धा यांनी केलेल्या प्रॉडक्ट डेव्हलपमेंट स्टॅंडर्ड डायजेशनच्या माध्यमातून रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रकल्प उभा करणे शक्य असल्याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना दिले आहे. चिखलदरा कॉफी ही विदर्भातच नव्हे तर संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. चिखलदरा येथे १८२० मध्ये इंग्रजांनी कॉफी लागवडीचा पहिला प्रयोग केला होता.

# 'जनगणना २०२७' साठी तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण

प्रतिनिधी ११ मार्च

**अमरावती :** आगामी 'जनगणना २०२७' च्या पूर्वतयारीला वेग आला आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील विविध स्तरावरील जनगणना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दि. १६ ते १८ मार्च या कालावधीत तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षण हे दि. १६ ते १८ मार्च या तीन दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात होणार आहे. प्रशिक्षणात जिल्हा जनगणना अधिकारी, सर्व चार्ज जनगणना अधिकारी, शहर जनगणना अधिकारी, अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी, जनगणना लिपिक आणि तांत्रिक सहाय्यक सहभागी होणार आहेत. कार्यशाळेत जनगणनेच्या कामात प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांची नेमकी कर्तव्यांची माहिती दिली जाणार आहे. घरांची यादी तयार करणे, घरांची गणना करणे आणि सीएमएमएस आणि एचएलबीसी पोर्टलचा वापर करण्याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.मुख्य जनगणना अधिकारी, जनगणना संचालनालयाच्या मार्गदर्शनात हे प्रशिक्षण पार पडणार आहे. प्रशिक्षणाला जनगणनेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले आहे.

# चिमण्यांसाठी 'बाल पक्षिमित्र' मृण्मयचा पुढाकार

प्रतिनिधी ११ मार्च





जलपात्र ठेवून देतोय जीवनदान

**कारंजा :** उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना पक्ष्यांची, विशेषतः चिमण्यांची पाण्यासाठी होणारी तगमग लक्षात घेऊन कारंजा येथील आर. जे. सी. शाळेतील इयत्ता पहिलीचा विद्यार्थी मृण्मय सचिन भालेराव याने घेतलेला पुढाकार सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरत आहे. लहान वयातच निसर्गप्रेमाची जाणीव ठेवत मृण्मय पक्ष्यांसाठी जलपात्र ठेवण्याचे काम करत असून तो इतरांनाही यासाठी प्रेरणा देत आहे.

उन्हाच्या कडाक्यामुळे पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या भेडसावत असते. हे लक्षात घेऊन मृण्मयने आपल्या घराच्या आवारात तसेच परिसरातील विविध ठिकाणी जलपात्र ठेवण्यास सुरुवात केली आहे. या पात्रांमध्ये तो नियमितपणे स्वच्छ पाणी भरतो तसेच पक्ष्यांसाठी धान्यही टाकतो. मातीची किंवा प्लास्टिकची भांडी ठेवून त्यात पाणी व दाणे टाकण्याची सवय त्याने स्वतः अंगीकारली असून यामुळे परिसरातील पक्ष्यांना मोठा दिलासा मिळत आहे.

मृण्मय रोज सकाळी आणि संध्याकाळी जलपात्रातील पाणी तपासतो, ते स्वच्छ ठेवतो आणि गरज पडल्यास पुन्हा पाणी भरतो. लहानशा उपक्रमातून पक्ष्यांप्रती असलेली त्याची आपुलकी आणि संवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येते. त्याच्या या उपक्रमाचे शाळेतील शिक्षक, मित्रमंडळी तसेच परिसरातील नागरिकांकडूनही कौतुक होत आहे. दरम्यान, वाढत्या उन्हाळ्यात पक्ष्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगत मृण्मय सर्वांना आवाहन करत आहे. घराच्या गच्चीवर, बाल्कनीत किंवा खिडकीजवळ मातीची किंवा प्लास्टिकची भांडी ठेवून त्यात पाणी भरावे. भांड्यातील पाणी दररोज बदलावे, जेणेकरून ते स्वच्छ राहील. तसेच भांडी कडक उन्हात न ठेवता सावलीत ठेवावीत, जेणेकरून पाणी गरम होणार नाही.

पाण्यासोबतच थोडे धान्य जसे तांदूळ, बाजरी किंवा ज्वारी टाकल्यास पक्ष्यांना अन्नाचीही मदत होईल, असेही तो सांगतो. लहानशा वयात पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणारा मृण्मयचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# कालव्याच्या पाण्यात दोन तरुणांचा मृत्यू

प्रतिनिधी ११ मार्च

**धामणगाव रेल्वे :** वाघोली शिवारातून वाहणाऱ्या कालव्यात पडून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी उघडकीस आली. एकाच कालव्यात दोन मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धीरज मारोतराव म्हात्रे (३८, रा. ढाकुलगाव) व दिनेश दीपक मरकाम (३२, रा. जळगाव मंगरूळ) अशी मृतांची नावे आहेत. धीरज हा सोमवारी सकाळी ऑटोरिक्षाने घराबाहेर पडला होता. मात्र रात्रीपर्यंत तो घरी परतला नाही. त्यामुळे आई व धाकटा भाऊ यांनी त्याचा शोध घेत कुर्डी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. मंगळवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास कालव्यात त्याचा मृतदेह आढळून आला. मात्र त्याच्याकडील ऑटोरिक्षाचा अद्याप शोध लागलेला नाही.दरम्यान, दिनेश मरकाम हा गव्हाच्या सिंचनासाठी वाघोली शिवारातील शेतात सोमवारी रात्री गेला होता. तो काही जणांसोबत सामूहिक शेती करत होता. मंगळवारी सकाळी त्याचाही मृतदेह कालव्याच्या पाटात आढळून आला.ष्एकाच परिसरात दोन तरुणांचे मृतदेह सापडल्याने नागरिकांमध्ये भीती व चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये दत्तापूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## तहसिलदार मंगरुळपिर यांचे कार्यालय,
### रा.मा.क्र. टिएनसी-४६/माळशेलु/ /२०२५-२६

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री प्रकाश उकंडा बेलखेडे व इतर रा माळशेलु ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अजर्जान्वये सरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे माळशेलु। येथील सर्वे क्र/गट क्र ३० मधील एकुण क्षेत्र ३.२६ हे आर पैकी सामाईक हिस्सा १.२३ आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये साधे **कुळ मोतीराम नारायण ८ (२) प्रमाणे कुशबा हकक प्राप्त झाला.** दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप / हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक- २०/०२/२०२६

शिक्का

तहसिलदार मंगरुळपीर

# सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ११ मार्च २०२६ | http://epaper.citynewssuperfast.com


## जिल्ह्यात २२ मार्च पर्यंत 'लोक जल उत्सव'

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी आणि सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी ८ ते २२ मार्च दरम्यान जिल्हयात सर्व ग्रामपंचायत स्तरावर 'लोक जल उत्सव' व मधापुरी आणि कापशी रोड या दोन ग्रामपंचायतीम ध्ये जल अर्पण दिवस साजरा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याला सांस्कृतिक आणि सामाजिक प्राधान्य देणे, स्थानिक जलउत्सव संस्थांत्मक करण्यासाठी प्रोत्साहित करणे, राज्य ते गावस्तरापर्यंत विविध विभागांमध्ये सम न्वय साधणे, पाणी गुणवत्ता, सौर ऊर्जा आणि देखभाल दुरूस्तीसाठी दिर्घकालीन लोकसहभागावर आधारित उपक्रम राबवले जाणार आहेत. पाणी पुरवठा आराखडा तयार करणे, आरोग्य, पोषण आणि महिला सक्षमीकरणाला जलसेवेशी जोडणे हा लोक जल उत्सवाच्या उपक्रमामागचा उद्देश आहे.

## अकोला तालुक्यात २० सहकारी संस्था अवसायनात

**अकोला :** अकोला तालुक्यातील २० सहकारी अंतिम अवसायनात असून, अवसायकांची सभा दि. २५ मार्च रोजी सकाळी ११ वा. अकोला तालुका सहकारी संस्था उपनिबंधक कार्यालय, जिल्हा सहकारी भूविकास बँक, अकोला येथे होणार आहे. अवसायनाबाबत स्पष्टीकरण, हरकत, आक्षेप असल्यास उपस्थित राहण्याचे आवाहन उपनिबंधक ज्योती मलिये यांनी केले आहे. त्यात सार्थ मागास महिला औद्योगिक सहकारी संस्था, महिला कल्याणी औ. सहकारी संस्था, समृद्धी मागासवर्गीय गारमेंट औ. वस्त्रोद्योग सह. संस्था, माँ पद्मावती महिला औ. स. संस्था, सुरभी अमरप्रीत गृहनिर्माण स. संस्था, सिद्धीविनायक गृहनिर्माण स. संस्था, रामेश्वर गृहनिर्माण संस्था, नूतन खेमका गृहनिर्माण संस्था, अकोला शहर मागास संस्था, मातोश्री सुशिक्षित बेरोजगार बहु. सेवा सह. संस्था, माऊली सुशिक्षित बेरोजगार बहु. सेवा सह. संस्था, सूर्योदय सु. बे. बहु. सेवा. संस्था यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, बालाजी सु. बे. सह. संस्था, लक्ष अभिनव शेती विविध तंत्रज्ञान व संगोपन व समृद्धी सहकारी संस्था, अस्मिता अभिनव सह. संस्था, युवा सु. बे. सेवा सह. संस्था, उन्नती अभिनव शेती वि. तं. सं. व समृद्धी सह. संस्था, हरीसिद्धा सु. बे. सह. संस्था, गणपती बहु. बे. सेवा. सह. संस्था, राष्ट्रतेज सु. बे. सह. संस्था आदी संस्थांचा समावेश आहे.

# राज्यस्तरीय पुरस्काराने जनाई निराधार वृद्धाश्रमाचा गौरव

**उपमुख्यमंत्री, महिला बालविकास मंत्री, महिलांची उपस्थिती**

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोट :** वसाली, नागापूर, बोर्डी येथे कार्यरत जनाई निराधार वृद्धाश्रमाला राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांसाठी निस्वार्थ सेवा देणारया या संस्थेच्या कार्याची दखल घेत मुंबई जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था संचालित जनाई निराधार वृद्धाश्रम गेल्या काही वर्षांपासून नागापूर बोर्डी परिसरात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांना निवारा, अन्न व मूलभूत सुविधा निशुल्क उपलब्ध करून देत आहे.

याशिवाय बेघर व निराधार नागरिकांना मदत, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,

वृक्षारोपण, महिलांवरील अन्याय अत्याचार विरोधात लढा तसेच बालकांना कायदेशीर मार्गदर्शन अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली जात आहे. या कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष जनार्दन जामनिक, सचिव एस्तेर जामनिक, कोषाध्यक्ष सुदेश रजाने तसेच विक्की वाकोडे, समीर स्वामी आणि श्रीकांत शिरसाट यांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सर्व महिला व पुरुष सदस्यांची सदस्यांना केलेल्या कार्याची पावती मिळाली याचा सर्वांना अभिमान प्राप्त झाला आहे,

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत जुगार अड्ड्यावर धाड; सहा जण ताब्यात, 1.22 लाखांचा मुद्देमाल जप्त




वि.प्रतिनिधी ११ मार्च

**अकोट :** अकोट ग्रामीण पोलिसांनी ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत कारवाई करत जुगार अड्ड्यावर धाड टाकून सहा जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत नगदीसह दोन दुचाकी असा एकूण १ लाख २२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० मार्च रोजी अकोट ग्रामीण पोलीस पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की आंबोडा येथे गणेश अस्वार यांच्या पानटपरीमागे विद्युत दिव्याच्या उजेडात काही जण 'तितली-भवरा' बोर्ड लावून पैशाचा हारजीतचा जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाड टाकली.

धाडीत सहा जण 'तितली-भवरा' या जुगारावर पैसे लावून खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. आरोपींची नावे सागर रविंद्र सिरस्कार, श्रीपाल सुखदेव श्रीनाथ, गोपाल सुखदेव सिरस्कार, गोपाल किसन ताडे, राजेश विनायक वानखडे व शिवदास देविदास सिरस्कार (सर्व रा. आंबोडा, ता. अकोट) अशी आहेत. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत घटनास्थळावरून 'तितली-भवरा' बोर्ड, नगदी २,०६० रुपये तसेच दोन मोटारसायकली (किंमत अंदाजे १ लाख २० हजार रुपये) असा एकूण १ लाख २२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वासुदेव ठासरे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक वि, चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोलीस उपनिरीक्षक वासुदेव ठोसरे तसेच पोहेकॉ हरिष सोनवणे, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप राऊत, गोपाल जाधव, नंदकिशोर नेमाडे व नितीन तेलगोटे यांनी केली.

# कौलखेड फाटा येथे सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ११ मार्च

**श्री संत गजानन महाराज प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन संगीतमय श्रीमद भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह**

**अकोला :** कौलखेड फाटा येथील श्री संत गजानन महाराज पंचक्रोशी संस्थानच्या वतीने ११ व्या वर्षानिमित्त भव्य श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा १३ मार्च ते २० मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सप्ताहाचे मुख्य आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध भागवताचार्य सुवर्ण पदक प्राप्त प्रा. डॉ. ह.भ.प. प्रशांत बुवा ठाकरे (अकोला) यांच्या मधुर वाणीतून होणारी श्रीमद् भागवत कथा. कथेची वेळ दररोज सकाळी १० ते १२ आणि दुपारी २ ते ४ अशी निश्चित करण्यात आली आहे.

### दैनिक धार्मिक कार्यक्रम

- सप्ताहामध्ये पहाटे ५ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असेल:
- सकाळी ५ ते ६: काकडा भजन
- सकाळी ८ ते १०: गाथा पारायण
- सायंकाळी ५ ते ६:३०: हरिपाठ
- संध्याकाळी ७ वाजता: महाआरती
- रात्री ७ ते ८:३०: महाप्रसाद
- रात्री ८:३० ते १०:३०: नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन

### महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती

या सोहळ्यात ह.भ.प. किशोर बुवा काळे, ह.भ.प. दादा बुवा कोळसकर, ह.भ.प. मोहन बुवा शेलार, ह.भ.प. हरिओम बुवा शास्त्री, ह.भ.प. शिवलीलाताई पाटील आणि ह.भ.प. रमेश बुवा दुधे,ह.भ.प. मनोहर बुवा सुभेकर ,ह.भ.प. सुरेश बुवा तवर, ह.भ.प.भुषण बुवा यांसारख्या दिग्गज कीर्तनकारांचे प्रबोधन होणार आहे. सप्ताहाची सांगता २० मार्च रोजी ह.भ.प. मनोहर बुवा सुभेकर यांच्या 'काल्याच्या कीर्तनाने' होईल. शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते ६ या वेळेत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी पळसो (बढे), बहादरपूर, खडका, गाजीपूर आणि कौलखेड परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष विठ्ठल पाटील तायडे व समस्त विश्वस्त मंडळाने केले आहे.

# तेल्हारा शहरातील विविध प्रभागामध्ये कचराकुंडीचे वितरण

प्रतिनिधी ११ मार्च

**तेल्हारा:** तेल्हारा नगरपरिषदे च्या वतिने स्वच्छ व सुंदर शहर ठेवण्याच्या उद्देशाने शहरातील विविध प्रभागामध्ये नागरिकांना नगराध्यक्षा सौ. वैशालीताई पालिवाल यांच्या उपस्थितीत रविवार दि.८ मार्च २०२६ रोजी पासून कचराकुंडीचे वितरण उपक्रमांतर्गत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना ओला कचरा वेगळा ठेवण्याबाबत जनजागृती करण्यात आली. शहर स्वच्छतेसाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून कचराकुंडीचा योग्य वापर करावा, असे आवाहन नगराध्यक्षा. वैशाली पालीवाल यांनी यावेळी केले. नगरपरिषद स्वच्छता विभागाच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असून स्वच्छता अभियानाला चालना मिळणार आहे. या प्रसंगी सतीश जयस्वाल, अरुणा ठाकरे, विजयसिंह बलोदे, प्रशांत विखे, भक्ती छांगाणी, अमित अग्रवाल, साक्षी वानखडे, संध्याताई गावत्रे, रुपेश चव्हाण, मंगेश ठाकरे यांच्यासह जितेंद्र पालिवाल, छोटु गावत्रे, प्रभाकर पवार, राजेश पालिवाल, पिंटू मुरकटे दीपक इंगळे, चेतन जयस्वाल, यांच्यासह स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जंगम मठात दमया स्वामी यात्रा महोत्सवाची महाप्रसादाने सांगता

प्रतिनिधी ११ मार्च




**बाळापूर :** येथील जंगम मठात जगदगुरु रेणुकाचार्य जयंती सदगुरु दमया स्वामी महाराजचा ९२९ वा यात्रा महोत्सवांची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. या याजे महोत्सवाचा लाभ हजारो भक्तांनी घेतला.

जगदगुरु रेणुकाचार्य यांच्या जयंती निमित्त श्री सदगुरु दमया स्वामी महाराज यांच्या ९२९ वी यात्रा महोत्सव गेल्या आठवडाभरा पासुन बाळापूरचा जंगम मठामध्ये रुदाभिषेक करुन आयोजकाचा वतीने पारायणचे सुध्दा आयोजन करण्यात आली होते. यात्रा महोत्सवाची सांगताशहरातुन दिंडी काढण्यात आली होती. जंगम मठ येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योती येडशीकर होत्या. नगर परिषदेचे माजी अध्यक्ष मो. जमीर, उपाध्यक्ष सुरेंद्र घोपटे, नगर परिषद सभापती पिंटु ठाकुर, माजी नगरसेवक डॉ. फय्याज हुसेन, प्रितेश गुजराथी यांचासह ३६०० किलो मीटर नर्मदा परिक्रमा करणारे अक्षय कांबेकर यांचा सुध्दा आयोजकांनी सत्कार केला. तसेच अधिक मास म्हणजे पुरुषौत्तम मासामध्ये श्री गुरु पंचाक्षरी शिवाचार्य स्वामी यांच्या मुखवटाची प्राणप्रतिष्ठा होणार असल्याचे मत आयोजकाचा वतीने कार्यक्रमात सांगण्यात आले. महाप्रसादाचे आयोजन कै. रामलिंगअय्या महादेवआप्पा बाळापूरकर स्मृतीप्रित्यर्थ मन्मथ बाळापुरकर, शिवरुद्र बाळापूरकर यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रास्ताविक उमेशआप्पा भुसारी यांनी तर संचालन रवी वखरे यांनी केले. तर या कार्यक्रम यशस्वीतेकरण्यासाठी वीरशैव लिंगायत समाज व महिला मंडळ यांनी परिक्षम घेतले.

# जुन्या वादातून युवकाचा मृत्यू; सहा आरोपी अटकेत, सहा दिवसांची पोलीस कोठडी

वि प्रतिनिधी ११ मार्च

**अकोट :** अकोट शहरातील राजेंद्रनगर परिसरात जुन्या वादातून झालेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ मार्च रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास राजेंद्रनगर, खानापूर वेस येथील लखन अंभोरे यांना जुन्या वादातून काही जणांनी जीवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी पाईप, चाकू तसेच दगड-विटांनी मारहाण केली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान १० मार्च रोजी सकाळी त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी सौ. दुर्गा लखन अंभोरे (रा. राजेंद्रनगर, अकोट) यांच्या फिर्यादीवरून राम पांडुरंग अंभोरे व इतरांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत या प्रकरणातील सहा आरोपींना अटक केली. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक वि, चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल माळवे, सह पोलीस निरीक्षक शमुवेल वानखडे तसेच डीबी पथक प्रमुख उपनिरीक्षक निलेश बारहाते, उपनिरीक्षक अविनाश मोहिते, उपनिरीक्षक समाधान मिसाळ व डीबी पथकाने केली.

# भक्तिभावाने केले शीतला मातेचे पूजन

प्रतिनिधी ११ मार्च

**♦ कुटुंबाच्या सुख-समृद्धी व आरोग्यासाठी केली प्रार्थना**



**अकोला :** शहरात फाल्गुन कृष्णपक्ष अष्टमीच्या मुहूर्तावर राजस्थानी समाजातील महिलांकडून बासोडा अर्थात शीतला माता पूजन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने करण्यात आले. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

धार्मिक आणि पौराणिक मान्यतेनुसार होळी उत्सवानंतर सात दिवसांनी येणाऱ्या फाल्गुन कृष्णपक्ष सप्तमी आणि अष्टमी तिथीला शीतला माता पूजनाला विशेष महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर राजस्थानी समाजातील महिला भाविकांनी अष्टमीच्या मुहूर्तावर जुने शहरातील जयहिंद चौक आणि हरिहर पेठ परिसरातील प्राचीन शीतला माता मंदिरात जाऊन बासोडा अर्थात शीतला माता पूजन मोठ्या भक्तिभावाने केले. यावेळी महिला भाविकांनी आपल्या कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी तसेच रोगराईपासून मुक्त राहण्यासाठी शीतला मातेला शीतल जल आणि निंबाची पाने तसेच हलवा-पुरी, गुलगुले, दहीभात आणि कांजीचे वडे असा विविध शीतल व्यंजनाचा नैवेद्य अर्पण करण्यात आले. मंदिर परिसरात महिलांनी शीतला माताची कथा पठण व श्रवण केले तसेच पारंपरिक गीते गात वातावरण भक्तिमय केले. यावेळी पहाटे ५ वाजल्यापासूनच महिला, पुरुष आणि बालगोपाळांची मोठी गर्दी मंदिरात पाहायला मिळाली.

# मलकापूर येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला :** येथून जवळच असलेल्या मलकापूर येथे सम्यक वाचक गृप आणि रमाबाई आंबेडकर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मलकापूर चे माजी सरपंच, वाचनालय चे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून. भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष मा.पी.जी वानखेडे सर हे होते. अकोला जिल्हा परिषद चे माजी अध्यक्षा पुष्पाताई इंगळे, कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना पुष्पाताई इंगळे म्हणाले की आजही देशात महिलांना दुय्यम प्रकारची वागणूक दिली जाते, त्यामुळे देशाची जशी पाहिजे तशी प्रगती झाली नाही आणि होणार नाही तरी महिलावर्ग ने खचून न जाता रमाबाई आंबेडकर, मातोश्री जिजाबाई, सावित्रीबाई फुले,अशा अनेक कर्तबगार महिलाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रगती करावी, यावेळी कर्तृत्ववान महिलांचा तथा नवनिर्वाचित नगरसेवक जयश्री ताई, बहाद्दूरकर, उज्ज्वलाताई पातोडे परागभाउ गंवई शेख समसु याचा सत्कार करण्यात आला व आशा स्वयंसेवीका कमल खैरे, सरिता सोनोने ,सविता वानखडे ,रेखाताई दंदी , गोपनारायणताई , वाघ ताई ,मायाताई इंगळे ,माया भिसे,सायलि वाघ , इंगोले ताई ,दामोदर ताई,जगताप ताई ,इत्यादी महिलांना प्रमाण पत्र देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम वानखेडे तर आभार प्रदर्शन किशोर तेलगोटे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बबनराव सदांशिव,रामेश्वर पाखरे ,सिद्धार्थ वानखेडे, अमोल खैरे, संजय सोनोने विद्यमान गवई ,वसंत इंगोले ,गणेश इंगळे ,हेमंत वाघ ,प्रभाकर भिसे यांनी अथक परिश्रम घेतले असे एका पत्राद्वारे अमोल खैरे कळवितात

# रिगल टॉकिज तीन दिवस बंद

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** न्यू रिगल टॉकिजचे संचालक तसेच सिने क्षेत्रातील प्रथितयश आझाद



हरीकिसन लड्डा यांच्या निधनामुळे रिगल टॉकिजचे शो तीन दिवस बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सिने क्षेत्रातील चित्रपट प्रदर्शन व वितरण व्यवसायाचे सखोल अभ्यासक, सिने क्षेत्र व सीसीसीए मध्ये वेळोवेळी उद्भवलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सदैव तत्पर व अग्रेसर राहणारे एक कार्यक्षम ,कार्यकुशल, प्रभावशाली , सक्षम नेतृत्व अग्रगण्य ज्येष्ठ सिने संचालक आझाद लड्डा होते. सिने क्षेत्रातील अनंतराव गावंडे, अनिल गावंडे यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.

# ईद-उल-फितरच्या निमित्ताने बाजार परिसरात स्ट्रीट लाईट लावण्याची मागणी

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** ईद-उल-फितरच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख बाजार परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी व सुरक्षिततेसाठी अतिरिक्त स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नगरसेवक रफीक सिद्दीकी यांनी अकोला महानगरपालिकेच्या महापौर महोदया, उपमहापौर महोदय, सभापती महोदय तसेच आयुक्त महोदय यांना निवेदन पत्र सादर केले आहे. या पत्रात नमूद करण्यात आले



आहे की, मुस्लिम समाजाचा सर्वात मोठा व पवित्र सण ईद-उल-फितर चंद्रदर्शनानंतर दिनांक २० किंवा २१ मार्च रोजी साजरा करण्यात येणार आहे. ईदच्या आधीच्या शेवटच्या पाच दिवसांत शहरातील प्रमुख बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिक खरेदीसाठी येत असतात. दिवसभर रोजा असल्यामुळे मुस्लिम बांधव प्रामुख्याने रात्रीच्या वेळी खरेदीसाठी बाहेर पडतात, त्यामुळे बाजार परिसरात उशिरापर्यंत मोठी गर्दी होते. विशेषतः मोहम्मद अली चौक ते फतेह चौक, मोहम्मद अली चौक ते गांधी चौक, मोहम्मद अली चौक ते तेलीपुरा चौक तसेच गांधी रोड ते सिटी कोतवाली, तिलक रोड आणि खुले नाट्यगृह ते फतेह चौक या मार्गांवर या दिवसांत हजारो नागरिकांची ये-जा होत असते. मात्र या मार्गांवर रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होतात तसेच अपघात होण्याची शक्यता देखील वाढते. नगरसेवक रफीक सिद्दीकी यांनी आपल्या निवेदनात ईदच्या निमित्ताने नागरिकांची सोय व सुरक्षितता लक्षात घेऊन या प्रमुख मार्गांवर अतिरिक्त स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे नागरिकांना खरेदीसाठी सोय होईल, वाहतूक सुरळीत राहील आणि कोणत्याही प्रकारच्या अप्रिय घटना टाळता येतील, असे त्यांनी नमूद केले. यावेळी राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवारचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया तसेच ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे नगरसेवक सैयद रहीम उर्फ सैदू भाई हे देखील उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ११ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# प्रधानमंत्री आवास योजनेचे हप्ते दोन महिन्यांपासून थकीत

प्रतिनिधी ११ मार्च

**कळंब** : घरकुल लाभार्थ्यांनी घर बांधण्याकरिता वेळोवेळी पाठपुरावा केला. या चढाओढीत घरकुलधारक अडचणीत आले आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेचे घरकुल बांधकामास लाभार्थ्यांनी सुरुवात केली.

शासनाकडून लवकर निधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, मागील २ महिन्यांपासून उर्वरित निधीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. स्पर्श प्रणाली अद्ययावत होत असल्याने निधीला विलंब होत असल्याचे कारण सांगितले जाते. लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामासाठी नातेवाइकांकडून पैसे उसनवारी घेतले. हप्ता मिळताच पैसे देऊ, असे आश्वासन दिले होते.

मात्र, निधीअभावी घरकुल लाभार्थी अडचणीत आले आहेत. डोंगरखर्डा, पिंपळशेडा येथील १०० च्या वर लाभार्थ्यांना हप्ता वितरित झालेला नाही. तर तालुक्यातील ६०० च्या वर लाभार्थी वंचित आहेत.

# आंबेडकरी चळवळीच्या यशामागे महिलांचा मोठा वाटा : ज.वि.पवार

## नेरमध्ये दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन

प्रतिनिधी ११ मार्च

**यवतमाळ** : आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा राहिला असून, ज्या चळवळीत महिलांचा सहभाग असतो तीच चळवळ यशस्वी होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व दलित पँथरचे संस्थापक सदस्य ज. वि. पवार यांनी केले. ते नेर येथे आयोजित दुसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रेखा मेश्राम ह्या होत्या. स्वागताध्यक्ष इंदिरा तलवारे, प्रमुख अतिथी म्हणून पपिता पाटील, वक्ते सुषमा पाखरे, डॉ. किर्ताराज लोणारे, प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार राहुल वासनिक उपस्थित होते. यावेळी अमेरीकेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रेव्हरी अवार्ड प्राप्त कांता अहिरे यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिराव फुले, बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई तसेच प्रा. सतेश्वर मोरे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. तसेच संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. रेखा मेश्राम, स्वागताध्यक्षा इंदिरा तलवारे, मुख्य निमंत्रक वनिता मोरे आणि मुख्य संयोजक डॉ. शरद मोरे यांचेही त्यांनी उल्लेख केला.

पवार पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यातून १९४० च्या दशकात शेड्युल्ड कास्ट फेडरेशन हा राजकीय पक्ष उदयास आला. या पक्षाचे पहिले अधिवेशन १८ आणि १९ जुलै १९४२ रोजी नागपूर येथील मोहन पार्क मैदानावर झाले होते. या अधिवेशनात महिलांचे स्वतंत्र अधिवेशनही झाले होते आणि त्याचे अध्यक्षस्थान सुलोचनाबाई डोंगरे यांनी भूषविले होते. त्या अधिवेशनात तब्बल पंचवीस हजार महिलांनी सहभाग घेत चळवळीचे महत्त्व स्पष्ट केले होते.

ते पुढे म्हणाले की, २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, "ज्या चळवळीत महिलांचा सहभाग असतो ती चळवळ यशस्वी ठरते." आंबेडकरी चळवळीचा इतिहास पाहिला असता हे स्पष्ट दिसून येते की, गेल्या अनेक दशकांत चळवळीने जे यश मिळवले त्यामागे महिलांचे मोठे योगदान आहे.

पवार यांनी सांगितले की, १९२७ मध्ये बाबासाहेबांनी जनआंदोलनाची सुरुवात केली तेव्हा महिला चळवळ अगदी बाल्यावस्थेत होती. महिलांनी कसा पेहराव करावा, कोणते दागिने वापरावेत याचे मार्गदर्शनही त्या काळात बाबासाहेबांच्या सहकाऱ्यांच्या कुटुंबीयांकडून दिले जात होते. मात्र कालांतराने ही चळवळ एवढी सक्षम झाली की महिलांनी देशाच्या सर्वोच्च पदांपर्यंत मजल मारली. एखादी महिला देशाची पंतप्रधान किंवा राष्ट्रपती होण्यापर्यंतचा प्रवास हा बाबासाहेबांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाच्या विचारांमधूनच घडला, असे त्यांनी नमूद केले. इतिहासात बुद्धकालीन समाजात महिलांना मोठा सन्मान होता आणि अनेक विदुषी त्या काळात प्रसिद्ध होत्या. मात्र नंतरच्या काळात धर्मग्रंथांच्या नावाखाली महिलांवर अनेक अन्यायकारक बंधने लादण्यात आली. पतीच्या मृत्यूनंतर सती जाण्यासारख्या अमानुष प्रथा प्रचलित होत्या. स्त्रीला परक्याचे धन किंवा पापाचे मूळ





मानणारी मानसिकता समाजात रुजवण्यात आली. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या हक्कांसाठी लढा देत त्यांना शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेचा मार्ग दाखविला, असेही पवार यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला समता सैनिक दलाच्या वतीने सलामी देण्यात आली.

या कार्यक्रमाचे संचालन वनिता मोरे व महादेव घरडे यांनी केले. आभार राजेश पाटील यांनी मानले. या संमेलनाचे डॉ. शरद मोरे हे मुख्य संयोजक आहेत. या संमेलनाला मोठ्या प्रमाणात नागरिक, महिला उपस्थित होत्या.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

दुसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनात विविध क्षेत्रात कार्यकरणा-यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्राचार्य योगिता चिंचोळे, प्रा. डॉ. विक्रांत मेश्राम, डॉ. प्रा. सुजाता वानखेडे, डॉ. पूजा गायकवाड, डॉ. किरण गायकवाड, डॉ. स्मिता चौधरी, पल्लवी मेश्राम, दिशा घरडे, चारु नन्नावरे, महादेव घरडे यांचा समावेश होता.

# विहिरीत पडला बिबट्या

## वनविभागाच्या रेस्क्यू टीमने दिलं जीवदान

प्रतिनिधी ११ मार्च

**यवतमाळ** : दारव्हा वनपरिक्षेत्रातील लाखखिंड गावाजवळील एका शेतात असलेल्या विहिरीत मंगळवारी १० मार्च रोजी बिबट्याची अडचण उभी राहिली. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे वनविभागाला त्वरित कळवण्यात आले. यवतमाळ रेस्क्यू टीमने विहिरीत पडलेल्या बिबट्याला सुरक्षितपणे बाहेर काढून त्याचा जीव वाचवला.

घटनेची माहिती मिळताच, वनपरिक्षेत्र अधिकारी गौरव चराटे यांनी उपवनसंरक्षक धनंजय वायभासे यांना कळवले. तत्काळ, रेस्क्यू टीम घटनास्थळी पोहोचली आणि विहिरीत पडलेल्या बिबट्याला फिजिकल रेस्क्यू करून बाहेर काढले. यामध्ये नितीन तांभारे, संजय माहूरकर, ओम शिंदे, कामेश भोयर, नागेश ढाकुलकर, योगेश मारबते, अनिकेत गव्हांडे आणि चैतन्य



सोनार यांच्या प्रमुख सहभागामुळे बिबट्याचा जीव वाचवता आला.

घटनास्थळी गर्दी होऊ नये, यासाठी दारव्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांनी पोलिस बंदोबस्त तैनात केला. वनविभागाच्या तातडीच्या आणि तत्पर कारवाईमुळे बिबट्याच्या जीवाला वाचवणारे यश मिळालं. आठ दिवसापूर्वी नेर तालुक्यातील बाणगाव येथे विहिरीत बिबट्यशा पडला होता. ही दुसरी घटना असून, वन्य प्राण्याच्या सुरक्षा धोक्यात आली आहे.

# पोखरी घाटात निलगायीची हत्या; वनविभागावर गंभीर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ११ मार्च

**महागाव** : महागाव तालुक्यातील काळी (दौ.) वनपरिक्षेत्रातील पोखरी घाट परिसरात सोमवारी मध्यरात्री अज्ञात शिकाऱ्यांनी निलगायी पकडून धारदार शस्त्रांनी हत्या केली आणि तिच्या अवयवांसह मांस मोठ्या प्रमाणात कापले. ही घटना आढळून आल्यावर परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

स्थानिक नागरिकांना मंगळवारी सकाळी पोखरी शिवारातील घाट परिसरात निलगायीचा मृतदेह अस्ताव्यस्त अवस्थेत आढळला. प्राथमिक पाहणीवरून हे स्पष्ट झाले की, ही घटना वन्य प्राण्यांच्या हल्ल्याचा नव्हे, तर मानवी शिकारीची आहे. मृतदेहावर पाय, पोटातील अवयव आणि मांस कापलेले दिसून आले. काळी (दौ.) वनपरिक्षेत्राचे रेंजर सम्राट



मेश्राम यांना दूरध्वनीवरून विचारणा केली असता त्यांनी प्रकरणाची माहिती नसल्याचे सांगितले, ज्यामुळे वनविभागाच्या गस्त व्यवस्था आणि देखरेख यावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि वन्यजीव प्रेमींनी दोषींविरुद्ध तात्काळ कारवाई, निलगायीच्या शिकारीची सखोल चौकशी आणि बेजबाबदार वनविभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. ही घटना वन्यजीव संरक्षणासाठी जबाबदार अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शिकाऱ्यांचे धाडस वाढत असल्याचे सूचित करते.

# लोंबकाळलेल्या वायरमुळे शॉर्टसर्किट; तीन एकर गहू जळून खाक

प्रतिनिधी ११ मार्च

**उमरखेड** : उमरखेड तालुक्यातील नागापूर रूपा शिवारात 10 मार्च 2026 रोजी शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमध्ये तीन एकर गहू जळून खाक झाला. शेतावरून जाणाऱ्या जिवंत विद्युत तारांचे घर्षण झाल्यामुळे ही आग लागली. यामध्ये दोन शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे नुकसान झाले.

घटना घडली तेव्हा रेहाना सय्यद अख्तर यांच्या शेतावर लोंबकळत असलेल्या जिवंत विद्युत तारांचा जोरात सुटलेल्या हवेमुळे घर्षण झाला आणि त्यातून निघालेल्या ठिणग्यांमुळे गव्हाला आग लागली. हवा जोरात असल्याने आग तात्काळ पसरली, पण शेतकऱ्यांनी आणि मजुरांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला.



■ विज वितरण कंपनीच्या शेतामध्ये लोंबकळलेल्या वायरांमुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. शेतकरी बार-बार विभागाकडे तक्रार करतात, पण दुर्लक्षामुळे मोठे नुकसान होऊ लागले आहे.

त्यानंतर, नगरपरिषद अग्निशमन दलाने तातडीने आग आटोक्यात आणली, पण तोपर्यंत रेहाना सय्यद अख्तर यांच्या दोन एकर आणि रोहित तामसकर यांच्या एक एकर गव्हाचे नुकसान झाले.

# शेंबाळपिंपरी शिष्टमंडळाची माजी मंत्री मनोहरराव नाईक यांना सदिच्छा भेट

प्रतिनिधी ११ मार्च

**पुसद** : लोकनेते मनोहरराव नाईक यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त ९ मार्च रोजी शेंबाळपिंपरी आणि परिसरातील मान्यवरांनी एकत्र येऊन पुसद येथील नाईक बंगला येथे भेट देत त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन दीर्घायुष्य व निरोगी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या. या भेटीला शेंबाळपिंपरी ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र महल्ले, प्रशासक जैनुल सिद्दीकी, तसेच अन्य अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिष्टमंडळाने आपल्या नेत्याला यावेळी शुभेच्छा देत त्यांचे योगदान आणि समाजातील स्थान याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याशिवाय,



कळमनुरी नगरपरिषदेतील पाचव्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले ख़ाजा भाई बागवान यांचा त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये राजे दिलीपराव देशमुख, रामकृष्ण चंदेल, तातुभाऊ देशमुख, शंकरराव तालंगकर, सदबाराव मोहटे, गुलाबराव वाहूळे, शिवानंद कांबळे, यादवराव खंदारे पाटील, ॲड. छायाताई प्रशांत देशमुख, रऊफोद्दीन सिद्दीकी, संग्राम देशमुख, फयाज सिद्दीकी, डॉ. पवन राठोड, राजेश चंदेल, सुनील वाहूळे, राजेश विनकरे, राजेश वाहूळे, विशाल कांबळे, पंढरीनाथ देशमुख, हाफिज मुजफ्फरोद्दीन सिद्दीकी, शेख हशम भाई, हशु पठाण, संजय विनकरे, गजानन देशमुख, रवि धुळे यांचा समावेश होता.

# आता गावस्तरावर कृषी अवजारे बँक

प्रतिनिधी ११ मार्च

**यवतमाळ** : महाराष्ट्र शासनाचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पचा दुसरा टप्पा जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येत असून यवतमाळ जिल्ह्यातील 559 गावे यात समाविष्ट आहेत. योजनेअंतर्गत महिला शेतकरी गटांना गावस्तरावर "कृषी अवजारे बँक" स्थापन करण्याची सुवर्णसंधी मिळत आहे.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांनी सांगितले की, सर्व शेतकऱ्यांकडे यंत्रसामग्री खरेदी करण्याची क्षमता नसल्याने ही बँक स्थापन करून अनुदानित यंत्रसामग्री भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना वेळेत व अचूक शेतीकाम करता येईल, उत्पादन आणि नफा वाढेल. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात "एक गाव, एक कृषी औजारे बँक" या तत्त्वावर प्रकल्प राबविला जाईल. पात्र महिला बचत गट, महिला गाव संघ तसेच माविम पुरस्कृत गट अर्ज करू शकतील.

# यवतमाळमध्ये शिक्षकांचा धरणे आंदोलन; शासनाकडे ४५ मागण्यांचे निवेदन सादर

प्रतिनिधी ११ मार्च

**यवतमाळ** : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने आज शिक्षण अधिकारी माध्यमिक कार्यालयासमोर धरणे आंदोलन राबवले.

आंदोलनात शिक्षकांनी एकजूट दाखवत आपले हक्क आणि मागण्या शासनाकडे मांडल्या. संघाच्या वतीने एकूण ४५ मागण्यांचे निवेदन शासनाला पाठवले गेले, ज्यामध्ये वेतन, थकीत बिले, जीपीएफ स्लिप, कामाच्या अटी व इतर शैक्षणिक प्रशासकीय मागण्या यांचा समावेश होता.

आंदोलनस्थळी उपशिक्षणाधिकारी नाईक, रत्ने उपस्थित होऊन शिक्षकांचे निवेदन स्वीकारले. या वेळी शिक्षक संघाचे प्रांतिक



अध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा अध्यक्ष पवन बन, जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश भुमकाळे, महिला प्रतिनिधी संध्या जिरापुरे, जिल्हास्तरीय पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष पवन बन यांच्या अध्यक्षतेखाली आंदोलनाचे प्रस्ताविक रामकृष्ण जीवतोडे, तर संचालन विजय खरोडे यांनी केले. आंदोलनादरम्यान शिक्षक संघाने ३१ मार्चपर्यंत जीपीएफ स्लिप देणे तसेच थकीत बिलांमधील त्रुटी दुरुस्त करणे या मागण्यांवर विशेष लक्ष दिले.

संघाने शासकीय अधिकाऱ्यांना शिक्षकांच्या समस्यांबाबत जागरूक केले आणि शासनाकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या आंदोलनामुळे शिक्षक संघाने स्थानिक प्रशासनासमोर आपली भूमिका ठळकपणे मांडली आहे.

# कै.डॉ.सुशीलाताई गावंडे यांचे जीवन विद्यार्थ्यांसह समाजासाठी समर्पित होते : डॉ.अतुल गावंडे

प्रतिनिधी ११ मार्च

**उमरखेड** : कै. डॉ. सुशीलाताई गावंडे यांचे जीवन हे विद्यार्थ्यांसाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी समर्पित होते, असे प्रतिपादन त्यांच्या सुपुत्र डॉ. अतुल गावंडे यांनी केले. गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाचे संजीवक डॉ. आत्मारामजी गावंडे यांना साथ देत त्यांनी महाविद्यालयासाठी आपल्या आयुष्याला समर्पित केले होते.

महाविद्यालयाच्या विकासासाठी रोटरी इंटरनॅशनलच्या मदतीने आणि स्वतःच्या भरघोस देणगीने त्यांची कार्यक्षमता एक व्रत बनली होती. मूळ भारतीय वंशाचे आणि सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेले प्रसिद्ध सर्जन व लेखक



डॉ. अतुल गावंडे आणि त्यांची पत्नी सुकन्या ॲड. सुमिता गावंडे अमेरिकाहून कै. डॉ. सुशीला गावंडे यांच्या अस्थिकलशासह गावंडे महाविद्यालयात आले आणि त्यांचे अस्थिकलश घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित केला.

या कार्यक्रमात रोटेरियन संग्रामसिंह भोसले, यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत, ॲड. सुमिता गावंडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनी कै. डॉ. सुशीलाताई गावंडे यांच्या आयुष्याच्या विविध पैलूंना उजाळा देत त्यांच्या कार्याची महती सांगितली. डॉ. गावंडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी नेहमीच आदर्श कार्य केले आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी त्यांचे जीवन समर्पित केले. ॲड. सुमिता गावंडे यांनी कै. डॉ. सुशीला गावंडे यांच्या जीवनप्रवासाची माहिती दिली.

त्यांच्या शेवटच्या इच्छेनुसार महाविद्यालयात त्यांच्या अस्थींचे विसर्जन करण्याचा निर्णय घेतला. तसेच, गावंडे महाविद्यालय आणि उमरखेड परिसराच्या विकासासाठी आम्ही कार्यरत राहू, असे आश्वासन दिले. कार्यक्रमात यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे संचालक डॉ. भरत देवसरकर, सुभाष शिंदे, ॲड. संतोष जैन, दत्तराव शिंदे, प्रो. डॉ. विजय गावंडे, प्रेमराव वानखेडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कदम आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी गावंडे परिवार आणि त्यांच्यावर प्रेम करणारे नागरिकदेखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी ११ मार्च

**मारेगाव** : मारेगाव पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या मार्डी येथील प्रफुल बंडू आत्राम वय ४० वर्ष या युवकाने 9 मार्च २०२६ ला सकाळी ११ वाजताच्या सुमारास स्वतःच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या वडिलाच्या च्या नावाने शेती असून तो शेती करायचा. शेतात उत्पन्न कमी झाल्याने आर्थिक विवंचनेत आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी पोलीस दाखल होऊन यांनी पंचनामा करून याबाबत बिटजमादार दिगांबर किनाके, पोलीस सागर दीपेवार, नरेंद्र तुमराम अधिक तपास करीत आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता मारेगाव शवविच्छेदनगृहात पाठविण्यात आला. त्याचे पच्छात आई, वडील, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.

# पांढरकवड्यात वक्तृत्व स्पर्धा; विद्यार्थीनींचा जोरदार सहभाग

प्रतिनिधी ११ मार्च

**पांढरकवडा** : जागतिक महिला दिनानिमित्त शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा येथे महिलांसाठी विशेष वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी केले.

कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या ॲड. सीमा गुंडावार यांनी "जेंडर इक्वलिटी" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महिलांनी आपले हक्क ओळखून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन महिला तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. सुजाता शेंडे यांनी केले.

या वक्तृत्व स्पर्धेत एकूण १५




विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत आशिया जाफिर पटेल (बी.ए. भाग १) हिने प्रथम क्रमांक मिळवला, अनुष्का मेश्राम (बी.एस्सी. द्वितीय वर्ष) द्वितीय आणि लक्ष्मी मेश्राम (बी.एस्सी. भाग २) तृतीय क्रमांक पटकाविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजाता शेंडे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. एकता शेटे (मेनकुदळे) यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. प्रगती टाले यांनी मानले. परीक्षक म्हणून डॉ. प्रवीण गजरे आणि डॉ. गजानन फुटाणे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. उषा राखुंडे व डॉ. निखत यांनी कार्यक्रमाला गौरव दिला.

महाविद्यालयातील प्राध्यापक व सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या आणि त्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेतून विद्यार्थिनींमध्ये सामाजिक जागरूकता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल टाकले गेले.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. ११ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# डम्पिंग गाऊडला दररोज आग



# प्रक्रिया न करता कचरा खा हो, जाळुन प्रदुषणाने मारू नका हो !

## परिसरातील नागरिकांचा आर्त टाहो





### आगीचे व्हिडीओ दररोज सोशल मिडीयावर व्हायरल

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया न करता कचरा खाण्यासाठी दररोज आग लावल्या जात आहे. याचे व्हिडीओ सामाजिक कार्यकर्ते अखील तेलीसह परिसरातील नागरिक दररोजच व्हायरल करीत आहे. तरीही निद्रावस्थेत असलेल्या भ्रष्ट नगर पालिका प्रशासनाला जाग येत नाही. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी भ्रष्ट ठेकेदारांना व अधिकाऱ्यांना कचरा खाण्याचा सल्ला दिला. मात्र, जाळुन प्रदुषण करून जीव मारू नका असे आवाहन केले आहे. सिटी न्युज सुपरफास्टने ही प्रक्रिया न करता खाल्ला कचरा या संदर्भात ६४ वृत्तांची वृत्त मालिका लावून भ्रष्टाचार केल्याचे सिध्द केले आहे.

● अतिष देशमुख @ वाशीम ●

वाशीम शहरातील अकोला नाका परिसरातील टेम्पल गार्डनमधील तारांगणाला भ्रष्टाचार झाकण्यासाठी आग लावून जाळण्यात आले . तर डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर कधीच प्रक्रिया झाली नाही. त्यामुळे भ्रष्ट अधिकारी कचरा दररोज आग लावून प्रदुषण करीत आहेत. या धुरामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. भ्रष्टाचारासाठी आगीच्या खेळीमुळे नागरिकांचे प्रदुषनामुळे बळी जात आहेत.त्यामुळे नगर पालिक अधिकारी व ठेकेदारांनो प्रक्रिया न करता कचरा खायचा तर खा हो मात्र जाळुन प्रदुषणाने मारू नका हो असा आर्त टाहो डम्पिंग ग्राऊंड परिसरातील नागरिक करीत आहेत. काल लागलेल्या आगीचे व्हिडीओ पुन्हा व्हायरल झाले. नागरिकांनी आरोग्य अधिकारी चव्हाण यांना कळविल्यानंतर आग विझविण्यात आली.

वाशीम नगर पालिकेच्या डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर १० ते १२ वर्षात प्रक्रिया न झाल्याने कचऱ्याचे डोंगरा ऐवढे ढिगच्या ढिग साचले होते. दै. 'सिटी न्युज सुपरफास्ट'ने कचऱ्यावर प्रक्रिया न करता कोट्यवधी रूपयाचा कचरा खाल्याचे वृत्त मालिका पुराव्यासह प्रसिध्द करून या कचऱ्यातील कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराला वाचा फोडली होती. हे प्रकरण भ्रष्टाचार रूपी रावणाच्या आंगलट येण्याची शक्यता वाढली असल्याने या भ्रष्टाचार रूपी रावणाने दसऱ्याच्या दिवशीच डम्पींग ग्राऊंडवरील डोंगरा एवढ्या कचऱ्यांच्या ढिगारांना आग लावून भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न केला होता. कारण कचऱ्यावर प्रक्रिया न झाल्याने अनेक वर्षापासून डम्पींग ग्राऊंडवर कचरा साचत होता. हे सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्त मालिकेमुळे सिध्द झाले.त्यामुळे भ्रष्टाचार रूपी रावणांनी डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लावली. या कचऱ्यात अनेकांचे हात काळे झाले असून जाळले की, जळले हे कळले नसले तरी . पुन्हा २४ डिसेंबर २०२३ रोजी सलग दुसऱ्यांदा या डम्पिंग ग्राउंड वरील कचऱ्याला आग लागल्याने ही आग लागली नसून या झालेला भ्रष्टाचार लपवण्यासाठी ही आग लावल्याचे सिद्ध झाले होते. त्यानंतर दोन वर्षापासूनच दररोजच या आगीचा धूर निघत असून भ्रष्टाचार भरपूर झाल्याचे सिध्द होत आहे. शिवाय धूरामुळे परिसरात प्रदुषण पसरले आहे. आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आता कचऱ्यावर समाजसेवक राम पाटील डोरले हे मोफत प्रक्रिया करीत असले तरीही काही विघ्न संतोषी भ्रष्टाचारी अधिकारी व ठेकेदार कचऱ्याला आग लावून देत आहेत.




सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express
बुधवार दि. २७ सप्टेंबर २०२३
टेम्पल गार्डन अन् तारांगण, बनले भ्रष्टाचाराचे आंगण...
भ्रष्टाचारात 'हात' मळले, जाळले की जळले, कारण नाही कळले !
* भरपावसात लागली आग * कोट्यावधीचा भ्रष्टाचार जळून खाक
* लोकप्रतिनिधींसहअनेकांचे हात * विद्युत बंद , आगीत कोणाचा संबंध
विरोधी लोकप्रतिनिधीचेही निवेदन आमआदमी पार्टीनेही केले होते आंदोलन...
जनतेच्या करामधून वसूल केलेले ९ कोटी रूपये पाण्यात...

### नागरिक विविध आजाराने त्रस्त, अधिकारी भ्रष्टाचार करून मस्त

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया न करता करोडो रूपये खाण्यासाठी कचरा दररोज आग लावून जाळण्यात येतो, या भयानक आगीमुळे परिसरात प्रदुषणाचा केमीकल युक्त काळा धूर पसरत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांना विविध स्वशनाच्या आजाराने त्रस्त झाले आहेत. अनेक वृध्दांना दमाच्या आजाराने ग्रासले आहेत. दररोज काळा धूर निघत असल्याने नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत आहे. प्रदुषणामुळे अनेकांचे बळी जात आहे. कोट्यवधीचा कचरा खाण्याच्या भ्रष्ट खेळीने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे नागरिकांचे जीवन वाचविण्यासाठी तरी जिल्हाधिकारी यांनी व प्रदुषण अधिकारी यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करून चौकशी करण्याची मागणी होती आहे.

### कचऱ्यावर कधीच नाही केली प्रक्रिया भ्रष्टाचाराची निरंतर क्रिया

१. ओला व सुका कचरा संकलीत करून मोजमाप करणे.
२. डम्पिंगवर प्लॅस्टीक कचरा अलग करून प्रक्रिया करणे.
३. ओल्या व सुक्या कचऱ्यापासून कम्पोस्ट खत तयार करणे.
४. ही सर्व प्रक्रिया जिओ टॅगींगच्या ड्रोनशुटींगमध्ये करणे.
५. तयार खताच्या बॅगा नागरिकांना व शेतकऱ्यांना मोफत देणे.
६. निरउपयोगी प्लॅस्टीक सिमेंट कारखान्याला देणे.
७.मोठ्या मिशनद्वारे प्रक्रिया करून दररोजचा लेखाजोखा देणे.
८.कचऱ्यापासून किती आरडीएफ निघाले याची नोंद घेणे.
९.आगीपासून प्रदुषण होवू न देणे, याची काळजी घेणे.


सिटी न्यूज सुपरफास्ट — वाशीम Express
गुरूवार दि.५ ऑक्टोबर २०२३
डम्पिंग गाऊंडचे... कोट्यवधी रूपये 'कचऱ्यात', नागरिकांचे आरोग्य 'धोक्यात' !
प्रक्रिया न करता दरमहा लाखो रूपये घशात * भ्रष्टाचारात अधिकारी व ठेकेदाराचे हात
शुक्रवार दि.६ ऑक्टोबर २०२३
डम्पींग ग्राऊंडचे कोट्यवधी रूपये 'कचऱ्यात'...
नगर पालिकेत भ्रष्टाचाराचे 'जाळे', कचऱ्यात तोंड अन् हातही 'काळे' !
*कचऱ्यावर प्रत्यक्षात प्रक्रिया केलेली दाखवा अन् बक्षीस मिळवा
मंगळवार दि.१० ऑक्टोबर २०२३
डम्पींग ग्राऊंडमुळे नागरिकांचे जीवनच कचऱ्यात...
प्रक्रियाची कागदोपत्री 'खेळी', प्रदुषणाने जातात 'बळी' !
*परिसरातील नागरिक विविध आजाराने त्रस्त * अधिकारी व ठेकेदार पैसे खावून मस्त
शुक्रवार दि.१३ ऑक्टोबर २०२३
वाशीमच्या डम्पींग ग्राऊंडवरील... प्रक्रिया न करताच खाल्ला कचरा
कचऱ्याला मान, भ्रष्टाचाराची घान, दिखावा शान !
*कचऱ्यावर प्रत्यक्षात प्रक्रिया केलेली दाखवा अन् बक्षीस मिळवा
अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करून हे सर्व खाल्ले...
मंगळवार दि.१७ ऑक्टोबर २०२३
भ्रष्टाचाराची निरंतर क्रिया, कचऱ्यावर झालीच नाही प्रक्रिया !
* वाशीम डम्पींग ग्राऊंडवरील प्रक्रिया न करताच खाल्ला कचरा
दि.२५ ऑक्टोबर २०२३
डम्पिंग गाऊंडवरील प्रक्रिया न करताच खाल्ला कचरा...
कचऱ्यात हात मळले जाळले की जळले कारण नाही कळले
तारांगणा नंतर डम्पींग गाऊंडला लावली आग !
भ्रष्टाचार भरपूर, दोन दिवसापासून निघतो धूर, नागरिकांमध्ये नाराजीचा सूर ...
रविवार दि.२६ नोव्हेंबर २०२३
तारांगणा नंतर डम्पींग ग्राऊंडला...
दुसऱ्यांदा लावली आग !
रविवार दि.३ डिसेंबर २०२३
तारांगणानंतर दुसऱ्यांदा लावली डम्पिंग ग्राऊंडला आग...
दरोजच निघतो आगीचा धूर!
* डम्पिंग ग्राऊंडमध्ये भ्रष्टाचार भरपूर * कारवाई पासून ठेवले दूर
शुक्रवार दि.८ डिसेंबर २०२३
तारांगणानंतर दुसऱ्यांदा लावली डम्पिंग ग्राऊंडला आग...
भ्रष्टाचाराचे जाळे, प्रदुषण निराळे, कचऱ्यात हात अन् तोंडही काळे !
* प्रक्रिया न करता दरमहा लाखो रूपये कचऱ्यात * नागरिकांचे आरोग्य धोक्यात
रविवार दि.१० डिसेंबर २०२३
वाशीम येथील डंपिंग ग्राउंडच्या कचरा प्रक्रियाची....
मॅनेज 'निविदा' , भ्रष्टाचाराची 'सुविधा' !
* भ्रष्ट ठेकेदारासोबत न.प. मुख्याधिकाऱ्यांची यारी * भ्रष्टाचारात भागीदारी * कधी पडणार भारी
बुधवार दि.१७ जानेवारी २०२४
डम्पिंग ग्राऊंडमध्ये दररोजच्या आगीतून भ्रष्टाचाराचा 'निचरा'...
प्रक्रिया न करता खाल्ला 'कचरा' !
*मोदीच्या स्वच्छ भारतला हरताळ * भ्रष्टाचाऱ्यांनी बदलला काळ
गुरूवार दि.१८ जानेवारी २०२४
अधिकारी व ठेकेदाराने प्रक्रिया न करता खाल्ला कचरा...
स्वच्छ भारत अभियान कचऱ्यात !
नागरिकांचे आरोग्य धोक्यात, भ्रष्टाचारी अधिकारी व ठेकेदाराची कमाई खोक्यात
आगीचा धूर, प्रदुषण सर्वदूर, भ्रष्टाचार भरपूर...
शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४
डम्पिंग गाऊंडवरील प्रक्रिया न करताच खाल्ला कचरा...
भ्रष्टाचाराची खेळी, बिले एकाच वेळी !
काम करणारे ठेकेदार बिलासाठी त्रस्त * काम न करणारे फिप्टी -फिफ्टी देवून मस्त

---

## विविध क्षेत्रामधील महिलांचा सत्कार



● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

येथील शांती कुंड येथे दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन महिलांच्या सन्मानार्थ उत्साहात साजरा करण्यात आला. अन्नपूर्णा महिला बचत गट, जुनी वस्ती मानोरा व ब्रह्माकुमारीज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी रजनी दीदी होत्या. तर प्रमुख उपस्थिती मानोरा पोलीस स्टेशनच्या ठाणेदार नयना पोहेकार मॅडम, सौ. रेखाताई हेमेंद्र ठाकरे, किरण यशवंत पद्मगीरवार आणि पुणे येथील वैशाली दीदी यांची होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तारा दीदी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ब्रह्माकुमारी रजनी दीदी यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी तारा दीदी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांना आशा सोनोने, आशाताई सोनकुसरे व समूहातील सर्व सदस्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल ठाकरे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन तारा दीदी यांनी मानले.

# थकला कर, म्हणे डफडे वाजून भर !

## थकबाकीदाराच्या घरासमोर लाऊड स्पीकर व डफडे वाजून कर वसुली

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

मालमत्ता कर थकबाकीदारांच्या घरासमोर लाऊड स्पीकर व डफडे वाजून कर वसूल करण्याची कारंजा नगर परिषदेने ६ मार्चपासून विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत थकबाकीदारांच्या घरासमोर चक्क डफडे वाजवत व ध्वनिक्षेपकाद्वारे जनजागृती करत नागरिकांना कर अदा करण्याचे आवाहन केले जात आहे.

या अभिनव मोहिमेमुळे कर वसुलीला गती मिळाली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.शहरात एकूण १३ हजार २५८ मालमत्ताधारक असून,त्यांच्याकडे ५ कोटी ४३ लाख रुपयांचा वार्षिक कर थकीत आहे.२८ फेब्रुवारीपर्यंत २ कोटी २५ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित थकबाकी लक्षात घेता ३१ मार्चपर्यंत आणखी २ कोटी रुपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट आहे. करवसुलीसाठी करवसुलीची मोहीम प्रभावी करण्यासाठी नगर परिषदेकडून १० विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.पथकांतील कर्मचारी विविध प्रभागांमध्ये जाऊन थकबाकीदारांकडून कर वसूल करत आहेत.दीर्घकाळ थकबाकी असलेल्या सुमारे १५० मालमत्ताधारकांना जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.कर न भरणाऱ्यांविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेतल्याचे दिसत आहे.



अप्रिय कारवाई टाळण्याचे आवाहन
नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरून मोहिमेला सहकार्य करावे आणि अप्रिय कारवाई टाळावी,असे आवाहन नगराध्यक्ष फरीदाबानु पुंजाणी,उपाध्यक्ष ॲड.फिरोज शेकुवाले,मुख्याधिकारी अभिषेक परदेशी व करनिरीक्षक विवेक वळसे यांनी केले आहे.

## शाक्यमुनी संस्थे मार्फत जागतिक महिला दिन साजरा

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर ग्रामपंचायत सुराळा जि. वाशीम येथे दिं.८ मार्च रोजी शाक्यमुनी मानव विकास प्रतिष्ठान हिंगोली शाखा मंगरुळपीर जिल्हा वाशीम च्या वतीने महिलांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक महिला दिनाचे आयोजन आम्रपाली गोविंदा राऊत सी. आर. पी. (उमेद अभियान ) यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच पवन मोतीराम राऊत यांच्या मातोश्री सुशीला बाई राऊत होत्या तर ग्रामसंघ प्रमुख मंदाबाई अशोक राऊत तसेच माजी सरपंच साफिया बी उपस्थित होत्या. कार्यक्रमाला वाशीम येथील सेंटर मॅनेजर श्री विनोद जाधव सर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाक्यमुनी मानव विकास प्रतिष्ठान हिंगोली शाखा -मंगरुळपीर जि वाशीम चे श्री देवानंद हरिभाऊ राऊत यांनी प्रास्ताविक केले तसेंच महिलांना विकसित भारताचे



स्वप्न पूर्ण करण्या साठी उद्योग व्यवसाय ची कास धरली पाहिजे या बाबत उद्योगाची माहिती दिली तसेच श्री विनोद जाधव सर यांनी डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता याबद्दल महिलांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाला गावातील बचत गटाच्या महिलांची उपस्थिती होती तसेच संस्थेच्या माध्यमातून जे विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात आहेत याबद्दल संस्थेचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा जाधव सर यांनी दिल्या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळा व्यवस्थापण समिती अध्यक्ष गोविंदा राऊत यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्या साठी सचिन राऊत, वर्धमान राऊत, सुधाकर वानखडे, इत्यादी नी प्रयत्न केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. ११ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# इंधनाचा खर्च वाढल्याने शहरवासीयांवर आता ऑटो भाडेवाढीची संक्रांत !

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** अमेरिका इराण युद्धाच्या झळा आता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात झाली आहे. एलपीजी गॅस चा तुटवडा सुरू झाल्याने उद्योग व हॉटेल व्यवसायिकांना कमर्शियल सिलेंडर देणे सरकारने थांबविले आहे. त्यामुळे अनेक हॉटेल व्यवसाय आणि उद्योग ज्यांचे गॅस सिलेंडर वाचून पानही हालत नाही. अशा व्यवसायिकांची डोकेदुखी चांगलीच वाढली आहे. अशातच आता ऑटो एलपीजी ची किंमत गेल्या पाच दिवसात २९ रुपयांनी वाढली आहे. मागील आठवड्यात गुरुवारपर्यंत ऑटो एलपीजी ची किंमत ५६.१० पैसे होती. परंतु गेल्या पाच दिवसात ऑटो

## ♦ भाडे वाढल्यास गॅसवर चालणाऱ्या ऑटो रिक्षामध्ये बसणार तरी कोण?

एलपीजी च्या किमती २८.३६ रुपयांनी वाढल्या आहेत. जी जवळपास ५०३ वाढ आहे. मंगळवारीच किमती अंदाजे ५.२० रुपयांनी वाढून ८४.९२ रुपयांवर पोहोचल्या जी आतापर्यंत ची ऑटो एलपीजी ची सर्वाधिक किंमत आहे. ऑटो एलपीजी च्या किमतीत झालेल्या या तीव्र वाढीनंतर शहरातील अनेक ऑटोचालकांनी भाडे वाढवण्याच्या निर्णय घेतला आहे. त्यामुळे दैनंदिन प्रवास करणाऱ्यांचे विशेषता विद्यार्थी, व्यावसायिक, आणि कामगार वर्गाचे मासिक बजेट बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १०५ रुपये प्रति लिटर पर्यंत एलपीजी गॅस च्या



किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शहरात एलपीजी गॅस आणि गो गॅस या हे दोन गॅस पंप शहरात आहेत मागील दोन दिवसांपासून या पंपांवर एलपीजी गॅस भरण्यासाठी ऑटो चालकांची गर्दी वाढली आहे. पेट्रोल पेक्षा एलपीजी वर चालणारा ऑटो जास्त एव्हरेज देतो आणि पेट्रोल पेक्षा एलपीजी गॅस च्या किमती कमी असल्याने अनेकांनी आपले जुने ऑटो विकून एलपीजी गॅस वर चालणारे ऑटो विकत घेतले आहेत. तर अनेकांनी आपल्या जुन्या ऑटो मध्ये गॅस किट बसवून घेतली आहे. अशां ऑटो चालकांची मात्र गॅसच्या किमती वाढल्याने चांगलीच गोची झाली आहे. कारण एकतर शहरात दहा किंवा वीस रुपयांच्या वर भाडे देण्यास प्रवासी तयार नाहीत. शहरात जेवढे अधिकृत ऑटो चालक आहेत. त्यापेक्षा कितीतरी अधिक अनाधिकृत ऑटोचालक आहेत. त्यामुळे एकेक प्रवासी घेण्यासाठी या ऑटो चालकांमध्ये चांगलीच चढाओढ पहावयास मिळते. एलपीजी गॅस च्या किमती दररोज हनुमानाच्या शेपटीप्रमाणे वाढतच चालल्या आहेत. त्यामुळे एलपीजी वर ऑटो चालविणाऱ्या चालकांनी भाडे वाढीचा निर्णय जरी घेतला. तरी या एलपीजी ऑटो मध्ये जास्त भाड्याने प्रवास करणार तरी कोण? हा प्रश्न निर्माण होत आहे. कारण शहरात आधीच अनधिकृत ऑटोचालकांचा सुळसुळाट आहे. तर दुसरीकडे बॅटरीवर चालणाऱ्या ऑटोंची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढल्याने प्रवासी या ऑटो ने प्रवास करण्यास प्राधान्य देतील. त्यामुळे एलपीजी गॅसवर चालणाऱ्या ऑटो चालकां पुढे आपला ऑटो चालून उदरनिर्वाह कसा करावा हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे.

# रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर ईदगाहची पाहणी

## ♦ नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला :** शहरातील मुस्लिम बांधव रमजान ईद मोठ्या उत्साहात ईद साजरी करतात. यंदा रमजान ईद २० किंवा २१ मार्च रोजी चंद्रदर्शनानुसार साजरी होण्याची शक्यता आहे. या दिवशी शहरातील विविध ईदगाहमध्ये मोठ्या संख्येने नागरिक ईदची नमाज अदा करण्यासाठी एकत्र येतात. त्या अनुषंगाने ईदगाह परिसरात आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी माजी उपमहापौर तथा नगरसेवक रफीक सिद्दीकी यांनी महापौर, उपमहापौर, सभापती तसेच मनपा आयुक्त यांना निवेदन सादर केले होते. निवेदनाची दखल घेत संबंधित विभागांना तात्काळ आवश्यक कामे करण्याचे आदेश दिले आहे. ईदपूर्वी ईदगाह परिसर स्वच्छ, सुरक्षित व सुस्थितीत राहावा यासाठी महानगरपालिकेकडून विविध कामांना गती देण्यात आली आहे. त्यानुसार हरिहरपेठ येथील ईदगाह येथे डांबरीकरण, मुरूमाची चुरी टाकणे, परिसराची साफसफाई तसेच रंगरंगोटी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच शहरातील इतर ईदगाहमध्येही मुरूमाची चुरी टाकणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि रंगरंगोटी करण्याचे निर्देश महानगरपालिकेच्या संबंधित विभागांना देण्यात आले आहेत, जेणेकरून ईदच्या दिवशी नमाजासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये.

दरम्यान हरिहरपेठ ईदगाहची पाहणी करण्यात आली. अकोला शहराचे काजी फैजान काझीमदिन काझी यांच्या उपस्थितीत ईदगाह परिसराची पाहणी करण्यात आली. नमाजासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी मैदानाची स्थिती, प्रवेशमार्ग, स्वच्छता तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. यावेळी अकोला महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता अजय गुजर, अभियंता आशीष निचड तसेच मनपा कर्मचारी उपस्थित होते. पाहणी करताना माजी उपमहापौर तथा नगरसेवक रफीक सिद्दीकी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे संघटक सचिव जावेद जकारिया, नगरसेवक सैयद रहीम उर्फ सैदु भाई, नगरसेवक सैयद वसीम, समाजसेवक शेख मुझम्मिल, शेख अनीस, समाजसेवक अब्दुल अजीम जाबिर, संबंधित ठेकेदार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ईदगाह परिसरातील आवश्यक कामे लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनीही सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ईदच्या पार्श्वभूमीवर करण्यात येत असलेल्या या कामांमुळे शहरातील मुस्लिम बांधवांना नमाज अदा करण्यासाठी स्वच्छ व सुस्थितीत परिसर उपलब्ध होणार असून रमजान ईदचा सण शांतता, बंधुता आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होण्यासाठी मदत होणार आहे.

# सिलेंडर अभावी हॉटेल, कॅटरिंग व्यवसायी संकटात

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला :** अकोल्यात जवळपास चारशे ते पाचशे हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट, कॅटरर्स व्यावसायिक आहेत. चार-पाच दिवसापासून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. शासनाने त्वरित व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सुरळीत करावा अन्यथा मोठ्या प्रमाणात हॉटेल रेस्टॉरंट स्वीट मार्ट हे बंद ठेवावे लागतील अशी भीती व्यक्त केली जात आहे.

अमेरिका इराण युद्धाची झळ आता अकोला शहराला देखील बसू लागली आहे. व्यावसायिकांना सिलेंडर अभावी व्यवसाय करणे कठीण झाले आहे. तसेच लग्नसराई सुरू असल्यामुळे कॅटरिंग व्यावसायीक सुद्धा मोठ्या अडचणीत सापडले आहेत. सिलेंडर मिळाले नाही तर व्यवसाय कसा करावा हा गंभीर प्रश्न आहे. शासन, प्रशासनाने या बाबतीत तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी अकोला हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष योगेश अग्रवाल यांनी केली आहे. आनंद अग्रवाल, प्रजापती यांनी देखील सद्यस्थितीवर प्रकाश टाकला. सिलेंडर मिळाले नाही तर शेगड्या, इंडक्शन द्वारे काम चालवावे लागेल. कारण शेवटी व्यवसाय सुरू ठेवावा लागतो असे ते म्हणाले.

# थकित करापोटी उत्तर झोन येथील मालमत्तेवर कारवाई

## ♦ अकोला. १० मार्च २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनी


प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला :** लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत अकोट रोड येथील वार्ड क्र. ण-१०, मधील मालमत्ता क्रमांक ३४७५-२३ धा. शेख कसम शेख यासीन व इतर ४ यांच्याकडे आज पर्यंत एकूण रक्कम रु. १३,३८,१३९/- एवढा मालमत्ता कर थकीत असल्याने सदर मालमत्तावर अटकावणीची कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहाय्यक अधीक्षक पंकज जोगळेकर, वरिष्ठ लिपिक हेमंत शेळवणे, लिपिक अरविंद पांडे, लिपिक मोहन घाटोळ, आदींची उपस्थिती होती.

# अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी.ड्रग्स तस्करीचे हब बनत आहे - आ.संजय खोडके

प्रतिनिधी ११ मार्च



**अमरावती :** पहिल्या आठवड्यातमध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त जप्त करीत शहरातील ड्रग्स तस्करीचा पर्दाफाश केला. या गंभीर प्रकरणाला घेऊन राज्यअधिवेशनात लक्षवेधी लावत असतांना हा विषय संबधित विभागाकडे जातात नुकतीच महाराष्ट्र पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने धाड टाकीत अमरावती शहरातून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला. अमरावती शहर आंतरराष्ट्रीय एम.डी.ड्रग्स तस्करीचे हब बनत असतांना मात्र अमरावती शहर पोलीस, संबंधित विभाग व पोलीस स्टेशन हे ठप्प बसले आहेत. असे सांगून आमदार संजय खोडके यांनी शहरातील एम.डी. ड्रग्स तस्करीबाबत राज्यविधिमंडळातून सर्जिकल स्ट्राईक केली.

राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासांमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती मधील एम.डी. ड्रग्स तस्करीला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे ? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी संभागृहा समक्ष सांगितले कि, अमरावती शहरामध्ये फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यामध्ये महसूल गुप्तचर संघटनेने अमरावती शहरात धाड टाकून १० कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला.

यावेळी त्यांनी शहर पोलीस विभागाला माहिती देऊन ही कारवाई केली. यापूर्वी सुद्धा अमरावती शहरात एका वर्षात २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अमरावती शहरात काही टोळी सक्रिय असून त्या शहरातील विविध भागात ड्रग्स ची विक्री करत असतात. मात्र ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ड्रग्स विक्री होते , तेथील पोलीस मात्र याबाबत ठप्प असून अमरावती शहरात पोलिसातील बडे अधिकारी यांचे सुद्धा याकडे दुर्लक्ष करत असल्याने अमरावती शहर ड्रग्स तस्करीचे हब बनत चालले असल्याचे आ. संजय खोडके यांनी सभागृहा समक्ष स्पष्ट केले. या संदर्भात आपण अधिवेशनात लक्षवेधी लावून धरत असतांना जेव्हा हा विषय संबंधित विभागाकडे जातो, त्यानंतर लगेच अमरावती शहरात गुन्हे शाखेने धाड टाकून नागपुरी गेट ठाण्या हद्दीतून ३ कोटींचा एम.डी. ड्रग्स साठा जप्त केला.

# जुन्या शहरातील आरोपींना सीन रिक्रिएशनसाठी घटनास्थळी आणले ; नातेवाईकांचा विरोध

प्रतिनिधी ११ मार्च



**अकोला :** जुने शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीत जुन्या वादातून दोन गटांत झालेल्या हाणामारीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींना मंगळवारी पोलिसांनी सीन रिक्रिएशनसाठी घटनास्थळी नेले होते. परंतु नातेवाईकांनी त्याला विरोध केला.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून आरोपींना पायी चालत घटनास्थळाकडे नेण्यात येत होते. मात्र, त्याच वेळी आरोपींच्या नातेवाईकांनी या प्रक्रियेला विरोध करण्यास सुरुवात केली. विरोध वाढल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती बिघडू नये या उद्देशाने पोलिसांनी सतर्कता दाखवत आरोपींना पुन्हा जुने शहर पोलीस स्टेशनमध्ये नेले. या प्रकरणाचा तपास सुरू असून, परिस्थितीनुसार आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. सध्या परिसरातील स्थिती सामान्य असल्याचे सांगण्यात आले.

# एम-स्क्वेअर ट्युटोरियल्सतर्फे 'एम-स्क्वेअर चॅम्पियन्स ट्रॉफी'चे यशस्वी आयोजन

प्रतिनिधी ११ मार्च




**अकोला :** विद्यार्थ्यांचा उत्साह, खिलाडूवृत्ती आणि त्यांच्यातील कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एम-स्क्वेअर ट्युटोरियल्सतर्फे 'एम-स्क्वेअर चॅम्पियन्स ट्रॉफी' क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जोशात आणि सांघिक भावनेने सहभाग घेतला.

मुलींच्या स्पर्धेत एम-स्क्वेअर रॉयल्स टीम विजयी झाली. तर मुलांच्या लीगचे विजेते एम-स्क्वेअर मार्व्हल्स टीम ठरली. संस्थेच्या वतीने सर्व स्पर्धकांचे अभिनंदन करण्यात आले. आणि विजेत्या संघांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. एम-स्क्वेअर ट्युटोरियल्स नेहमीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकासालाही प्राधान्य देत आले आहे. एम-स्क्वेअर ट्युटोरियल्स मध्ये शिक्षणासोबतच चॅम्पियन्स घडतात हे वैशिष्ट्य आहे.

# उन्हाळ्याच्या तोंडावर नगरसेवकांची स्वच्छ पाण्याची मागणी

## स्थायी समितीत अन्य विषयांना दिली मंजुरी



प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला:** शहरातील सर्वच झोन मधील नागरिक हे प्रदूषित, गढुळयुक्त पाण्याने त्रस्त झाले आहे. असे असताना स्वच्छ पाण्यासाठी सत्तारुढ पक्षासोबत विरोधकांनी पुन्हा एकदा तगदा लावला आहे. पण, ढिम्म महापालिका प्रशासन काय करते हे पाहण्यासारखे असेल. मंगळवारी जवळपास सव्वा तीन कोटींपेक्षा अधिकच्या निविदांना स्थायी समितीने मान्यता दिली. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी बैठकीत पाणी पुरवठा बाबतीत आढावा घेतला. महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे उपस्थित होते. स्थायी समितीच्या सभेत मानधन तत्वावरील १०१ कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीला सहा महिन्यासाठी मान्यता देण्यात आली. त्याच बरोबर दीड कोटींपेक्षा अधिक रक्कमेच्या औषध खरेदीला मान्यता देण्यात आली. इतकेच नाही तर जवळ पास पाच झोन मधील पाणी पुरवठ्याच्या देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी जवळपास तीन कोटी ३० लाखांच्या पाच निविदा मंजुर करण्यात आल्या. असे असताना सत्तारुढ व विरोधी नगरसेवकांनी अस्वच्छ पाणीपुरवठ्यासाठीची ओरड कायम ठेवली असून उन्हाळ्याच्या तोंडावर महापालिकेची पोलखोल सागर भारुका, निलेश देव, विनोद मापारी या नगरसेवकांनी केली.

# भाटे क्लबचा विषय बारगळला

## ♦ छत्रपती संभाजीनगरच्या तापडीयांना करावे लागणार कोट्यवधी परत

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** मोक्याची जागा असलेल्या भाटे क्लबच्या विकास रखडला असून या प्रकरणात उच्च न्यायालयाने स्थायी समितीने निर्णय घेण्याचे आदेश दिला होता. भाटे क्लब विकासक तापडीया यांना ती आता मिळणार नसल्याची माहिती असून त्यासाठी जुन्या विकासकला महापालिका भरलेला पैसा परत करणार असल्याची माहिती मिळाली.

अकोला शहरातील मोक्याची जागा असलेल्या भाटे क्लब च्या विकासासाठी छत्रपती संभाजीनगर येथील तापडीया या विकासकांना जागा देण्यात आली होती. पण, त्या विषयी अनेक अडचणी आल्या. त्या विषयीची एक याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित असून विकासकाला ही जागा ताब्यात देत विकास करायचा की पुन्हा ही जागा ताब्यात घेत महापालिका नव्याने टेंडर काढणार या विषयावर आज स्थायी समिती सभेत चर्चा झाली. या चर्चेत ही जागा पुन्हा महापालिका ताब्यात घेणार असून यासाठी विकासकाला त्याचे जमा असलेला पैसा परत करण्याची तयारी मनपा प्रशासनाने सुरु केली आहे. ही जागा राज्य शासनाची असून त्यावर पुन्हा महापालिका कुठले विकास काम प्रस्तावित करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या विषयावर उच्च न्यायालयात काय निकाल लागतो हे पाहण्यासारखे असेल.

# अकोल्यातील अलंकार मार्केटमध्ये चोरीचा प्रयत्न, व्यापाऱ्याने चोराला पकडले

## ♦ चोराने साथीदारांना बोलावले महिलांसह टोळी घटनास्थळी दाखल

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** अलंकार मार्केट परिसरात व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आयसीआयसीआय बँकेच्या गल्लीत, सिंधू बँकेजवळ एका दुकानासमोर ठेवलेला कूलर चोरण्याचा प्रयत्न एका व्यक्तीने केला. मात्र दुकानदाराने त्याला रंगेहात पकडल्याने हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर त्या व्यक्तीने आपल्या साथीदारांना बोलावल्याचे सांगितले जात असून काही वेळातच महिलांसह अनेक जण घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे संपूर्ण बाजारपेठेत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अकोल्यातील अलंकार मार्केट परिसरात आज दुपारी एक धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. आयसीआयसीआय बँकेच्या गल्लीत, सिंधू बँकेजवळ असलेल्या एका दुकानासमोर ठेवलेला कूलर चोरण्याचा प्रयत्न एका व्यक्तीने केला. मात्र दुकानदाराने संशय आल्याने त्या व्यक्तीला रंगेहात पकडले आणि त्याच्याकडे चौकशी सुरू केली. त्यानंतर संबंधित व्यक्तीने आपल्या काही साथीदारांना फोन करून घटनास्थळी बोलावल्याचे सांगितले जात आहे. काही वेळातच त्या व्यक्तीचे अनेक साथीदार, ज्यामध्ये काही महिलांचाही समावेश होता, तेथे पोहोचले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार त्यांच्या काही साथीदारांच्या हातात शस्त्रे असल्याचीही चर्चा आहे.

या प्रकारामुळे अलंकार मार्केट परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून बाजारपेठेतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# जागतिक श्रवण दिना निमित्त शिबीर

प्रतिनिधी ११ मार्च

**अकोला :** कार्यक्रमादरम्यान अनेक मुलांची श्रवण तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये श्रवण समस्या आढळलेल्या गरजू मुलांना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. ही श्रवणयंत्रे जिल्हा नियोजन अनुदान योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या उपक्रमामुळे श्रवणदोष असलेल्या मुलांना योग्य उपचार व सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी पालक व उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. स्वाती बैचवाल यांनी सांगितले की, कान हा शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. त्यामुळे त्याची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. कानाशी संबंधित कोणतीही समस्या किंवा त्रास जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा तसेच वेळोवेळी तपासणी करून घ्यावी.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK